




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २०७ * नांदेड * बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन



**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** देशातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉ. डी. वाय. (ज्ञानदेव यशवंतराव) पाटील यांचे मंगळवारी सकाळी कोल्हापूर येथील त्यांच्या कसबा बावडा येथील निवासस्थानी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

डॉ. डी. वाय. पाटील हे देशातील शिक्षण क्षेत्रातील एक दूरदर्शी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. वैद्यकीय, अभियांत्रिकी, दंतवैद्यकीय, कृषी, व्यवस्थापन आणि इतर व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांमुळे लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. महाराष्ट्रासह देशातील विविध भागांत त्यांच्या नावाने उभ्या राहिलेल्या शैक्षणिक संस्था आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र मानल्या जातात.

डॉ. डी. वाय. पाटील यांचा परिवार शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय आहे. त्यांच्या कुटुंबात अनेक सदस्य विविध शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनाशी संबंधित आहेत. त्यांचे पुत्र डॉ. संजय डी. वाय. पाटील, सतेज उर्फ बंटी डी.वाय. पाटील, विजय डी. पाटील, डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांच्यासह कन्या डॉ. नंदिता पालशेतकर आणि इतर सदस्य शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे नातू ऋतुराज पाटील हेही सार्वजनिक जीवनात सक्रिय आहेत.

राजकीय कारकिर्दीत त्यांनी बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे राज्यपाल म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. समाजसेवा, शिक्षण आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविले होते.

डॉ. पाटील यांच्या निधनाची माहिती समोर आल्यानंतर महाराष्ट्रातील विविध राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील मान्यवर तसेच माजी विद्यार्थ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कार्यामुळे शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली परंपरा आणि समाजाभिमुख दृष्टीकोन पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

शिक्षणाचा प्रसार, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा निर्माण करणे, हे त्यांचे जीवनकार्य होते. त्यांच्या निधनाने देशाने एक दूरदर्शी शिक्षणमहर्षी गमावल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

## किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयास मंजुरी

**किनवट (प्रतिनिधी)–** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय तसेच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू करण्यास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायिक अधिकारी, कर्मचारी यांची पदे आणि खर्चाच्या आर्थिक तरतुदीस विधि व न्याय विभागाने हिरवा कंदील दाखवला आहे.

किनवट आणि परिसरातील नागरिकांना, पक्षकारांना तसेच वकिलांना न्यायासाठी नांदेड अथवा इतर दूरच्या ठिकाणी जावे लागत होते. ही अडचण लक्षात घेऊन आ.भीमराव केराम यांनी किनवट येथे अतिरिक्त सत्र न्यायालय मंजूर व्हावे, यासाठी राज्य सरकारकडे सातत्याने आणि आक्रमक पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या या प्रयत्नांना मोठे यश आले आहे.किनवट येथे अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालयाला मंजुरी मिळाल्याचे वृत्त समजताच स्थानिक नागरिक आणि वकील वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.किनवटसारख्या दुर्गम भागातील पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचवण्यासाठी हे न्यायालय अत्यंत महत्त्वाचे ठरेल. राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे,या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आ.भीमराव केराम यांना धन्यवाद देतो, अशी प्रतिक्रिया किनवट वकील संघाचे अध्यक्ष ॲड. माज बडगुजर यांनी व्यक्त केली आहे.

## ई-२० इंधनाविरोधात दिल्लीत अरविंद केजरीवाल यांचा एल्गार, पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानाकडे आपचा मोर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ई-२० इंधनाच्या विरोधाची धग आता संपूर्ण देशभरात पसरली असताना याच मुद्द्यावरून आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे देखील मैदानात उतरले आहे. ई-२० (ए २०) इंधनाच्या विरोधात अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा काढला आहे.

पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. असे असताना हा मोर्चा निघाला होता. परिणामी फिरोजशाह रोडवर पोलिसांनी हा मोर्चा अडवला गेला. यानंतर पत्रकारांशी बोलताना, केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापुढे झुकल्याचा आरोप केला. अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली देशावर ए २० चा निर्णय थोपवला जातोय असेही केजरीवाल म्हणाले.

केंद्र सरकारवर निशाणा साधताना केजरीवाल यांनी आरोप केला की, पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली इथेनॉल-मिश्रित इंधनाला प्रोत्साहन देत आहेत. अरविंद केजरीवाल यांनी आरोप केला की, पंतप्रधान ट्रम्प यांच्यापुढे झुकत आहेत आणि या धोरणाचा फायदा भारतीय शेतकऱ्यांऐवजी अमेरिकन शेतकऱ्यांना होईल. त्यांनी सांगितले की, २.३३ लाख लोकांनी इथेनॉल धोरणाला विरोध केला आहे.

पुढे बोलताना अरविंद केजरीवाल असेही म्हणाले की, देशभरात इथेनॉल लागू करणे हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी किंवा हरदीप सिंग पुरी यांच्या स्तरावरील निर्णय नाही, तर तो पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय आहे. त्यांनी आरोप केला की, हा निर्णय केवळ ट्रम्प यांच्या दबावाखाली घेतला जात आहे आणि सरकारने बाह्य दबावाला बळी न पडता लोकांना शुद्ध पेट्रोल द्यावे, असे आवाहन केले.

आप नेते अनुराग धांडा म्हणाले की, लोक खूप नाराज आहेत. ते अडचणीत आहेत. ३० कोटी वाहने नादुरुस्त होण्याच्या मार्गावर आहेत आणि पंतप्रधान कोणाचेही ऐकत नाहीत. केवळ अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या दबावाखाली इथेनॉल लादले जात आहे, असे ते म्हणाले.

## नांदेड जिल्ह्यात ४ तासांच्या कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये २२१ सराईतांची तपासणी; ७ गुन्हे दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार दि. ३ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून ते दि. ४ ऑगस्टच्या ३ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या कारवाईत २२१ गुन्हेगारांची तपासणी करून ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या कारवाईत मालमत्तेविरुद्ध व शरीराविरुद्ध गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार, तडीपार, हिस्ट्रीशीटर, पाहिजे/फरारी आरोपींची सखोल पडताळणी करण्यात आली. कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये ३४ अधिकारी, ३१ अंमलदारांनी कारवाई केली आहे. त्यांच्याकडून कलम ५५, ५६, ५७ मधील तडीपार प्रस्तावित गुन्हेगार तपासणी ९१, एमपीडीएमधून सुटलेले गुन्हेगार तपासणी ६३, माल व शरीराविरुद्धचे सराईत गुन्हेगार तपासणी २२१, आर्म्स ॲक्ट प्रमाणे दाखल गुन्हे २, कलम १२२ मपोका अन्वये दाखल गुन्हे ४, वॉरंट बजावणी (बीडब्ल्यू/एनबीडब्ल्यू) ३०, समन्स बजावणी १४ असे एकूण ५८ गुन्हे दाखल करण्यात आले.

सदर विशेष मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक, भोकर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील अधिकारी व अंमलदार तसेच आरसीपी पथकाने सक्रिय सहभाग घेत व्यापक तपासणी मोहीम राबविली.

## बिहार-बंगालमध्ये वीज कोसळून ११ मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अनेक राज्यांत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवनावर मोठा परिणाम झाला असून वाहतूक, दैनंदिन व्यवहार आणि सार्वजनिक सुरक्षेवर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये सोमवारी वीज पडून ११ जणांचा मृत्यू झाला, तर १४ जण जखमी झाले आहेत. दुसरीकडे, उत्तराखंडमध्ये भूस्खलन, रस्ते खचणे आणि वाहतूक खोळंबल्याच्या घटना घडल्या असून अनेक राज्यांत पावसाचा जोर कायम आहे.

बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका बिहार आणि पश्चिम बंगालला बसला. वीज पडल्याच्या विविध घटनांमध्ये बिहारमध्ये सात तर पश्चिम बंगालच्या हावडा जिल्ह्यात चार जणांचा मृत्यू झाला. हावडा जिल्ह्यातील जगतबल्लवपूर, आमता आणि बागनान परिसरात वीज पडल्याच्या घटना घडल्या.

## तीन हजारांची लाच घेताना डॉक्टर एसीबीच्या जाळ्यात

### वार्षिक अहवालावर स्वाक्षरीसाठी मागितली लाच

**नांदेड (प्रतिनिधी)–** धर्माबाद तालुक्यातील करखेली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. सोमेश नागोराव मोरे यांना ३ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने सोमवारी सायंकाळी रंगेहाथ ताब्यात घेतले. वार्षिक कार्यमूल्यमापन अहवालावर अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करण्यासाठी त्यांनी लाच मागितली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २४ वर्षीय तक्रारदार हे धर्माबाद तालुक्यातील करखेली प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

त्यांच्या वार्षिक कार्यमूल्यमापन अहवालावर अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करून तो पुनर्विलोकनासाठी जिल्हा हिवताप अधिकारी यांच्याकडे पाठविण्यासाठी डॉ. मोरे यांनी सुरुवातीला ४ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यानंतर एसीबीने सापळा रचला. करखेली प्राथमिक आरोग्य केंद्रात तक्रारदाराकडून ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने डॉ. मोरे यांना ताब्यात घेतले.

या प्रकरणात धर्माबाद पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.









**नांदेड :** मागील काही दिवसांत झालेल्या पावसामुळे विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण जलाशयात पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे नांदेडकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. (छाया : करणसिंह बैस)


## उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत आज नांदेडमध्ये



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत हे नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी कोल्हापूर विमानतळ येथून विमानाने नांदेड विमानतळ येथे दुपारी १२ वा. आगमन व मोटारीने सप्तगिरी बॅक्वेट हॉल नांदेडकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. राखीव. दुपारी १ वा. नांदेड जिल्हा शिवसेना लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मतदारसंघनिहाय आढवा बैठक स्थळ- सप्तगिरी बॅक्वेट हॉल कौठा नांदेड.

दुपारी ३ वा. नांदेड जिल्हा उद्योग विभाग व म.औ. वि.म.आढावा बैठकीस उपस्थिती. स्थळ- उद्योग भवन, सहकारी औद्योगिक वसाहत शिवाजीनगर नांदेड. दुपारी ४ वा. नांदेड जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनासमवेत संवाद. स्थळ- उद्योग भवन, सहकारी औद्योगिक वसाहत शिवाजीनगर नांदेड. सायं. ५ वा. मराठी भाषा विभाग आढावा व साहित्यिकांसमवेत संवाद. स्थळ- जिल्हा नियोजन समिती सभागृह नांदेड. सायं. ६ वा. पत्रकार परिषदेस उपस्थिती. स्थळ- जिल्हा नियोजन समिती सभागृह नांदेड. सायं. ६.३० नांदेड येथून मोटारीने नांदेड विमातळाकडे प्रयाण. सायं. ७ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व विमानाने कोल्हापूरकडे प्रयाण करतील.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आपण भारतात आहोत, म्हणजे काय?

लोकशाही व्यवस्थेत निर्णय हे केवळ संबंधित पक्षांपुरते मर्यादित नसतात, ते समाजासाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे कोणत्याही निरीक्षणांमधील प्रत्येक शब्द आणि त्यामागील संदेश अत्यंत महत्त्वाचा असतो. नुकत्याच एका प्रकरणात एका उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी आपण भारतात आहोत, वास्तववादी भूमिका घ्यावी लागेल असे निरीक्षण नोंदविले आहे. या निरीक्षणामुळे कायद्याच्या अंमलबजावणीबाबत आणि सार्वजनिक आरोग्याच्या निकषांबाबत अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणात हॉटेलमध्ये तपासणीदरम्यान दोन लहान कीटक आढळल्याचे नमूद करण्यात आले होते. त्याचबरोबर स्वच्छतेबाबतचा एकूण अहवाल समाधानकारक असल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे केवळ या कारणावरून परवाना निलंबित करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले. निर्णयाच्या कायदेशीर बाजूवर मतभेद असू शकतात; मात्र आपण भारतात आहोत हा उल्लेख अधिक चर्चेचा विषय ठरला आहे. कधी बेरोजगार तरुणाला कॉक्रोच म्हटले जाते तर कधीही आपल्या देशात चलता है, असेही म्हटले जाते. ही बाब निश्चितच दुर्दैवी आणि लोकशाहीला घातक आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. चंद्रावर यशस्वी मोहिमा राबवणारा, डिजिटल व्यवहारात जगाला दिशा दाखवणारा, औषधनिर्मिती, विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेत वेगाने प्रगती करणारा देश म्हणून भारताची ओळख आहे. अशा देशात सार्वजनिक आरोग्य आणि अन्नसुरक्षेच्या बाबतीत निकष शिथिल ठेवावेत किंवा भारतात असे चालते असा संदेश जाणे योग्य ठरेल का? हा प्रश्न प्रत्येक नागरिकाला पडणे स्वाभाविक आहे. अन्नसुरक्षा हा केवळ नियमांचा विषय नाही, तर तो नागरिकांच्या आरोग्याशी आणि जीवनाशी संबंधित मूलभूत अधिकार आहे. हॉटेल, रेस्टॉरंट किंवा अन्नप्रक्रिया उद्योगांनी स्वच्छतेचे सर्वोच्च निकष पाळणे ही त्यांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. निरीक्षणादरम्यान किरकोळ त्रुटी आढळल्यास त्या कितपत गंभीर आहेत, याचे मूल्यांकन निश्चितच वस्तुनिष्ठ असले पाहिजे; परंतु त्याचवेळी स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड मान्य केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेशही समाजात जाणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळां-मध्ये मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कर्मचारी अडचणीत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. याचा अर्थ अन्नसुरक्षेची जबाबदारी पार पाडणाऱ्या यंत्रणेलाच पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे शासनाने मनुष्यबळ, आधुनिक प्रयोगशाळा आणि तांत्रिक साधनसामग्री यांची उपलब्धता वाढविण्यावर भर देणे गरजेचे आहे. सक्षम यंत्रणा आणि न्याय्य अंमलबजावणी या दोन्ही गोष्टी एकत्रच आवश्यक आहेत. लोकशाहीत कायद्यापुढे सर्व समान असतात. कायद्याची अंमलबजावणी व्यक्ती, संस्था किंवा परिस्थिती पाहून बदलता कामा नये. आपण भारतात आहोत असे म्हणणे म्हणजे या ठिकाणी अस्वच्छता चालू शकते असे म्हणण्यासारखे आहे. त्यातून निकष कमी करण्याचा किंवा दर्जाबाबत तडजोड करण्याचा अर्थ निघू नये. उलट आपण भारतात आहोत, म्हणून सर्वोच्च दर्जा राखला पाहिजे असा संदेश अधिक प्रेरणादायी आणि राष्ट्रहिताचा ठरला असता. निरीक्षणे ही समाजासाठी मूल्यांचा आधार असतात. त्यामुळे अशा निरीक्षणांमधून उत्कृष्टतेचा, शिस्तीचा आणि कायद्यावरील विश्वासाचा संदेश जाणे आवश्यक आहे. भारताची प्रतिमा उंचावण्याची जबाबदारी प्रत्येक संस्थेवर आहे. त्यामुळे हा भारत आहे हे कारण देऊन वास्तव स्वीकारण्याऐवजी हा भारत आहे, म्हणून सर्वोत्तम मानके निर्माण करू हा दृष्टिकोन अधिक योग्य ठरेल. आजचा भारत जागतिक स्तरावर नेतृत्त्व करण्याची क्षमता बाळगतो. अशा वेळी सार्वजनिक आरोग्य, अन्नसुरक्षा आणि कायद्याची अंमलबजावणी याबाबत कोणताही संदेश देताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारची निरीक्षणे व त्यावरील तथाकथित मत हे लोकशाहीतील समानता, उत्तरदायित्व आणि उच्च दर्जाच्या प्रशासनाविषयी चुकीचा संदेश देण्याचा धोका निर्माण करू शकतात. त्यामुळे अशा प्रकारचे भाष्य आणि त्यातून निर्माण होणारे संकेत हे लोकशाहीच्या मूल्यांशी सुसंगत आहेत का, हा प्रश्न निश्चितच उपस्थित होतो.

# व्यसनाधीनता आणि तरुण पिढी

आजचा युवक आपल्या देशाची फार मोठी शक्ती आहे. परंतु तो आतून पोखरला आहे. व्यसनाच्या आहारी गेला आहे. त्यामुळे त्याचे जीवन अधीर झाले आहे. युवक कोणाला म्हणावे? ज्यांच्या चेहऱ्यावर तेज आहे. देहामध्ये शक्ती आहे. मनामध्ये उत्साह आहे. बुद्धीमध्ये विवेक आहे. हृदयामध्ये करूणा आहे. इंद्रीययावर संयम आहे. मातृभूमीवर प्रेम आहे. इच्छाशक्ती प्रबळ आहे. जीवनामध्ये दीन-दुबळ्याचा मित्र आहे. चरित्र ज्याचे शुद्ध आहे. मन ज्याचे स्थिर आहे. व्यसनापासून मुक्त आहे. सेवेसाठी तत्पर आहे. आत्मविश्वास त्यांच्यामध्ये ठासून भरलेला आहे. सत्य हा ज्याचा ईश्वर आहे. जीवनामध्ये नीतीवंत आहे. आई-वडिलांचा आणि गुरुजनांचा आदर करतो. त्याच्यामध्ये मनामध्ये परिवर्तनाची प्रेरणा आहे. आधुनिकतेची आवड आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारतो. अंधश्रद्धेपासून दूर राहतो. या सर्व गोष्टी असणाऱ्या व्यक्तीला खरा युवक समजतात. परंतु आज व्यसन ही एक मानसिक बिमारी झालेली आहे. तरुणाने व्यसनाचा त्याग करून आपले जीवन देशाच्या आणि समाजाच्या उत्कर्षासाठी समर्पित केले पाहिजे. बलशाली व सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी व्यसनमुक्त भारत घडवणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. भारताला महासत्ता व्हायचे असेल तर तरुण हा व्यसनमुक्त होणे काळाची गरज आहे.

तरुण पिढी हा देशाचा कणा आहे. असे आपल्याकडे नेहमी म्हटले जाते. कोणत्याही राष्ट्राचे भवितव्य त्या देशातील तरुण पिढी कशी आहे यावर अवलंबून असते. आज भारताकडे जगातील सर्वात मोठी तरुण लोकसंख्या असलेला देश म्हणून पाहिले जाते. हे तरुण शक्ती देशाच्या प्रगतीला एका नव्या उंचीवर नेऊ शकते. परंतु अत्यंत खेदाची बाब म्हणजे आज याच ऊर्जावान तरुण पिढीला व्यसनाधीनतेची वाळवी पोखरत आहे. आधुनिकतेचे आणि बदललेल्या जीवनशैलीच्या नावाखाली आजच्या तरुण वर्ग वेगवेगळ्या व्यसनाच्या जाळ्यात वेगाने ओढला जात आहे. जी संपूर्ण समाजासाठी एक अत्यंत चिंताजनक बाब बनली आहे. व्यसनाधीनता म्हणजे काय? सोप्या भाषेत सांगायचे असेल तर एखाद्या गोष्टीची एवढी



सवय होणे की तिच्याशिवाय जगणे अशक्य वाटू लागणे म्हणजे व्यसन होय. जेव्हा एखादी व्यक्ती शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या एखाद्या अमली पदार्थावर किंवा सवयीवर पूर्णपणे अवलंबून राहते. तेव्हा त्याला व्यसनाधीनता म्हणतात. आज व्यसनाचे स्वरूप केवळ तंबाखू, सिगारेट किंवा दारू पुरते मर्यादित राहिलेले नाही.

यात ड्रग्स, गांजा, अफू, चरस, हेरॉईन यांसारख्या अमली पदार्थाची भर पडलेली आहे. इतकेच नव्हे तर आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचे व्यसन ही देखील एक नवीन आणि तितकीच भयंकर जटील समस्या म्हणून देशासमोर आली आहे. तरुण पिढी व्यसनाकडे का वळली. तरुण वयात मुलं-मुली व्यसनाच्या आहारी का जातात? याचा सखोल विचार करणे गरजेचे आहे. सोशल मीडियावरील लाईक्स आणि कमेंट्सच्या हव्यासापोटी तरुण मुले-मुली स्वतःचे मानसिक संतुलन गमावून बसतात. अभ्यासाच्या वेळी मोबाईल बाजूला न ठेवल्यामुळे अवघा अर्धा तास अभ्यास केला तरी प्रचंड थकवा आणि झोप येणे, असे शारीरिक आणि मानसिक परिणाम डिजिटल व्यसनामुळे होतात.

**व्यसनाधीनतेचे घातक परिणाम**

व्यसनाधीनतेचे परिणाम केवळ या व्यक्तीपुरते मर्यादित नसून त्याचे दूरगामी परिणाम कुटुंब आणि समाजावर होतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडणे, अमली पदार्थाच्या सेवनाने कर्करोग, यकृत खराब होणे, हृदय विकार आणि श्वासानाचे आजार होतात. मानसिक पातळीवर तरुणांचे स्मरणशक्ती कमकुवत होते. चिडचिडेपणा वाढतो आणि ते हिंसक बनतात. मेंदूच्या विकासावर याचा विपरीत परिणाम होतो. यामुळे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते.

**आर्थिक नुकसान आणि गुन्हेगारीत वाढ**

व्यसन पूर्ण करण्यासाठी पैशाची गरज असते. सुरुवातीला घरातून चोरून पैसे घेतले जातात. परंतु जेव्हा घरातून पैसे मिळवणे बंद होते. तेव्हा तरुण चोरी, दरोडे, फसवणूक, सायबर गुन्हे आणि ड्रग्स, चरस यांसारख्या अत्यंत धोकादायक गुन्हेगारी मार्गाचा अवलंब करतात. कौटुंबिक विघटन आणि देशाचे नुकसान एका तरुण मुलाचे व्यसन संपूर्ण कुटुंबाचा आनंद हिरावून घेते. घरात रोजचे वाद, आर्थिक चलन आणि समाजातील बदनामी यामुळे हसते-खेळते कुटुंब उद्ध्वस्त होते.

जी तरुण शक्ती देशाच्या विकासात हातभार लावायला हवी ती व्यसनाच्या विळख्यात अडकणारी अकार्यक्षम बनते. त्यामुळे देशाचा मानवी विकास खुंटतो. व्यसनाधीनता ही समस्या वेळेत रोखली नाही तर देशाचा भविष्य काळ अंध:कारमय होईल. यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकाची भूमिका आणि सुसंवाद यामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका ठरते. पालकांनी आपल्या मुलाशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे गरजेचे आहे. मुलांना व्यसनातून किंवा अभ्यासाच्या तणावातून बाहेर काढण्यासाठी त्यांच्याशी सतत संवाद साधला पाहिजे. मुलांना पुरेसा वेळ देणे आणि त्यांचे कौतुक करणे आवश्यक आहे.

शिक्षणातून जनजागृती आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालय केवळ पुस्तकी ज्ञान न देता व्यसनाधीनतेच्या दुष्परिणामावर समजून सांगावे लागतात. आमली पदार्थ विकणाऱ्यांवर पूर्णपणे बंदी असली पाहिजे. बेकायदेशीर ड्रग्स विकणाऱ्या व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. व्यसनमुक्ती केंद्राची मदत आणि सकारात्मक गोष्टीकडे वळवणे हा उत्तम मार्ग आहे. जे तरुण व्यसनाच्या गर्तेत खूप खोलवर गेले आहेत, त्यांना योग्य मार्गदर्शन व्यसनमुक्ती केंद्राच्या मदतीने पुन्हा मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. तरुणाच्या उर्जेला योग्य दिशा देण्यासाठी त्यांना कला, क्रीडा, संगीत, ट्रेकिंग किंवा समाजोपयोगी कामांमध्ये गुंतवले पाहिजे. ते आवश्यक आहे. नेहमीच शारीरिक व्यायाम केल्यामुळे शरीरात सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. त्यामुळे मन अभ्यासात लागते, आणि व्यसनापासून दूर राहण्यास मदत होते. व्यसनाधीनता ही आजच्या युवा पिढीला लागलेली एक भयंकर कीड आहे. व्यसन थोडा वेळ सुख देते, पण आयुष्यभराचे दुःख देऊन जाते.

हे तरुणाने समजून घेतले पाहिजे. निखळ आनंदी आणि सुदृढ आयुष्य जगण्यासाठी कोणत्याही व्यसनाची गरज नसते. तरूणांनी स्वतःच्या मनावर ताबा मिळवून शपथ निश्चित करून व्यसनाला नाही म्हणायला शिकले पाहिजे. जेव्हा देशातील तरुण व्यसनमुक्त सुशिक्षित निरोगी आणि सुसंस्कृत होईल. तेव्हाच खऱ्या अर्थाने एक बलशाली आणि समृद्ध राष्ट्र निर्माण होईल. आजची युवा पिढी हाच आपल्या देशाचा खरा मजबूत पाया आहे. त्यामुळे या तरुणाला व्यसनाच्या भयानक अंधारातून वेळेत बाहेर काढणे. ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे, किंवा कडक कायदे करून समाजात हा बदल घडणार नाही, तर प्रत्येक तरुणांनी स्वतःच्या चंचल मनावर ताबा ठेवून मोठे ध्येय सतत डोळ्यासमोर ठेवले पाहिजे.

जेव्हा देशातील सर्व तरुण पिढी अमली पदार्थांना नाकारून कला, शिक्षण, क्रीडा आणि देशाच्या प्रगतीसाठी आपले संपूर्ण ऊर्जा लावेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने एक सुसंस्कृत आणि समृद्ध राष्ट्र निर्माण होईल. आपण सर्वांनी या ध्येयासाठी एकत्रित येऊन प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. चला आपण सर्व संकल्प करूया. व्यसनाला नकार। जीवनाला होकार, व्यसन सोडा, आयुष्य जोडा. उज्ज्वल भविष्याकडे पाऊल टाका, ही अपेक्षा!

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
नांदेड

# वाहतूक सिग्नल : शिस्त, सुरक्षा आणि जबाबदारी



दरवर्षी ५ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय वाहतूक सिग्नल दिन साजरा केला जातो. रस्त्यावरचा प्रत्येक प्रवास सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत व्हावा, यासाठी वाहतूक सिग्नल अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. लाल, पिवळा आणि हिरवा हे तीन रंग केवळ दिवे नसून ते शिस्त, संयम, जबाबदारी आणि सुरक्षिततेचा संदेश देतात. वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होते, वेळेची बचत होते आणि प्रत्येक नागरिकाचा प्रवास अधिक सुरक्षित बनतो. म्हणूनच वाहतूक सिग्नल हे सुरक्षित समाज आणि जबाबदार नागरिकत्वाचे प्रतीक मानले जातात. वाहतूक सिग्नल हे रस्ते वाहतुकीचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करणारे प्रभावी साधन आहे. सिग्नलमुळे वाहनचालक, पादचारी, सायकलस्वार आणि इतर प्रवासी यांची हालचाल निश्चित क्रमाने होते. प्रत्येकाला आपली पाळी येईपर्यंत थांबावे लागते, त्यामुळे घाई, गोंधळ आणि नियमभंगाचे प्रकार कमी होतात.

चौकांमध्ये अनेक दिशांनी येणाऱ्या वाहनांची सुरक्षितपणे ये-जा होण्यासाठी वाहतूक सिग्नल महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होते आणि प्रवास अधिक सुरळीत व सुरक्षित बनतो. सिग्नलचे पालन केल्याने वाहनचालकांमध्ये संयम, शिस्त आणि जबाबदारीची भावना विकसित होते.

रस्ते हे सर्व नागरिकांसाठी समान असतात. त्यामुळे प्रत्येकाने वाहतूक सिग्नलचे काटेकोर पालन केल्यास शिस्तबद्ध वाहतुकीची सवय लागते, अपघातांचे प्रमाण कमी होते आणि सुरक्षित, सुसंस्कृत समाज घडण्यास हातभार लागतो. वाहतूक सिग्नलचे काटेकोर पालन केल्याने रस्ते अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. चौकांमध्ये कोणत्या दिशेने वाहने पुढे जावीत आणि कोणत्या दिशेने थांबावीत याचे स्पष्ट नियमन सिग्नलद्वारे केले जाते. त्यामुळे वाहनांची समोरासमोर किंवा बाजूने होणारी टक्कर टाळण्यास मदत होते. भरधाव वेगाने वाहन चालवणे, लाल सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे किंवा अचानक वळण घेणे यांसारख्या नियमभंगामुळे गंभीर अपघात घडतात. मात्र, वाहतूक सिग्नलचे पालन केल्यास अशा धोकादायक घटनांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवता येते. सिग्नलमुळे पादचाऱ्यांना रस्ता सुरक्षितपणे ओलांडण्यासाठी योग्य वेळ मिळतो. विशेषतः शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्ती यांना रस्ता ओलांडताना अधिक सुरक्षितता मिळते. यामुळे जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि मालमत्तेची हानी कमी होते. त्यामुळे वाहतूक सिग्नल हे केवळ वाहतुकीचे नियंत्रण करणारे साधन नसून मानवी जीवनाचे संरक्षण करणारे महत्त्वाचे सुरक्षा कवच आहे. वाहतूक सिग्नल हे प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. सिग्नलचे योग्य पालन केल्यामुळे वाहनचालक, पादचारी, सायकलस्वार, दुचाकीस्वार तसेच ज्येष्ठ नागरिक यांना सुरक्षितपणे प्रवास करता येतो. वाहतुकीचे नियमन व्यवस्थित झाल्याने गोंधळ कमी होतो आणि अपघात होण्याची शक्यता घटते. वाहतूक सिग्नलचे योग्य नियोजन आणि नियमांचे पालन केल्यास वाहतूक सुरळीत व नियोजनबद्ध राहते. वाहनांची हालचाल ठराविक क्रमाने होत असल्यामुळे चौकांमध्ये अनावश्यक गर्दी आणि वाहतूक कोंडी कमी होते. त्यामुळे प्रवाशांना विनाकारण थांबावे लागत नाही आणि त्यांचा मौल्यवान वेळ वाचतो.

वाहतूक कोंडी कमी झाल्याने वाहने दीर्घकाळ इंजिन सुरू ठेवून उभी राहत नाहीत. त्यामुळे इंधनाचा अनावश्यक वापर टळतो आणि वाहनचालकांचा खर्चही कमी होतो. इंधनाची बचत ही केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. वाहनांमधून होणारे धूर व हानिकारक वायूंचे उत्सर्जन कमी झाल्यामुळे वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. परिणामी पर्यावरण अधिक स्वच्छ राहते आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण होते. अशा प्रकारे वाहतूक सिग्नलचे पालन केल्याने वेळ, इंधन आणि पर्यावरण या तिन्ही बाबींमध्ये महत्त्वपूर्ण लाभ मिळतो. वाहतूक नियमांचे पालन करणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. रस्त्यावर वाहन चालवताना किंवा पादचारी म्हणून वावरताना वाहतूक सिग्नल आणि नियमांचे पालन केल्याने स्वतःची तसेच इतरांची सुरक्षितता सुनिश्चित होते. त्यामुळे जबाबदार नागरिकत्वाची भावना अधिक दृढ होते.

लाल सिग्नल तोडणे, वेगमर्यादा ओलांडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे किंवा वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणे हे केवळ नियमभंग नसून अनेकदा गंभीर अपघातांना कारणीभूत ठरते. म्हणून प्रत्येकाने वाहतुकीचे नियम प्रामाणिकपणे पाळणे आवश्यक आहे. स्वतः वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याचे महत्त्व समजावून सांगणे ही एका सजग नागरिकाची ओळख आहे. कुटुंबातील सदस्य, मित्र आणि समाजातील इतर नागरिक यांनाही नियमांचे पालन करण्यासाठी प्रोत्साहित केल्यास रस्ते अधिक सुरक्षित बनू शकतात. शिस्त, संयम आणि जबाबदारी या मूल्यांचा स्वीकार केल्यास वाहतुकीची संस्कृती अधिक सक्षम होते. प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून वाहतूक सिग्नल व नियमांचे काटेकोर पालन केले, तर अपघातमुक्त, सुरक्षित आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती निश्चितच होईल. वाहतूक सिग्नलमध्ये वापरले जाणारे लाल, पिवळा आणि हिरवा हे तीन रंग रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्रत्येक रंगाचा विशिष्ट अर्थ असून त्यानुसार वाहनचालक आणि पादचाऱ्यांनी योग्य कृती करणे अपेक्षित असते. या रंगांचे पालन केल्यामुळे वाहतूक सुरळीत राहते, अपघातांचे प्रमाण कमी होते आणि प्रत्येकाचा प्रवास सुरक्षित बनतो.

**लाल (थांबा):** लाल रंग म्हणजे पूर्णपणे थांबा. लाल सिग्नल लागल्यानंतर वाहनचालकांनी स्टॉप लाईनच्या मागे वाहन थांबवावे आणि हिरवा सिग्नल लागेपर्यंत प्रतीक्षा करावी. लाल सिग्नल तोडणे हा गंभीर नियमभंग असून त्यामुळे अपघात होण्याचा धोका वाढतो.

**पिवळा (सावध रहा):** पिवळा रंग म्हणजे सावध रहा किंवा थांबण्याची अथवा पुढे जाण्याची तयारी करा. हा सिग्नल लाल आणि हिरवा यांच्या दरम्यानचा इशारा असतो. या वेळी वाहनचालकांनी वेग कमी करून परिस्थितीनुसार सुरक्षित निर्णय घ्यावा. पिवळा सिग्नल दिसताच वेग वाढवून चौक ओलांडण्याचा प्रयत्न करू नये.

**हिरवा (पुढे जा):** हिरवा रंग म्हणजे मार्ग मोकळा असल्यास पुढे जा. मात्र हिरवा सिग्नल लागला तरी घाई न करता दोन्ही बाजूंनी येणारी वाहने आणि पादचारी यांची खात्री करूनच पुढे जावे. सुरक्षितता आणि संयम यांना नेहमी प्राधान्य द्यावे. अशा प्रकारे वाहतूक सिग्नलचे हे तीन रंग केवळ संकेत नसून शिस्त, सुरक्षितता आणि जबाबदार नागरिकत्वाचे प्रतीक आहेत. प्रत्येकाने त्यांचे काटेकोर पालन केल्यास रस्ते अधिक सुरक्षित आणि अपघातमुक्त होण्यास मोठी मदत होते. वाहतूक सिग्नलचे पालन करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच सिग्नल पाळताना आवश्यक ती काळजी घेणेही गरजेचे आहे. थोडासा निष्काळजीपणा देखील गंभीर अपघातास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक वाहनचालक आणि पादचाऱ्याने वाहतुकीचे नियम प्रामाणिकपणे पाळून सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

वाहन चालवताना सिग्नलचे दिवे, रस्ता चिन्हे आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांकडे नेहमी लक्ष द्यावे. सिग्नल बदलण्याच्या वेळी घाईगडबड न करता संयमाने वाहन चालवावे. वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर, संदेश पाठवणे किंवा इतर कोणतेही लक्ष विचलित करणारे काम टाळावे, कारण त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. वेगमर्यादेचे काटेकोर पालन करावे आणि चौकाजवळ पोहोचताना वाहनाचा वेग कमी करावा. झेब्रा क्रॉसिंगवर पादचाऱ्यांना प्रथम रस्ता ओलांडण्याची संधी द्यावी. तसेच लेन शिस्त पाळावी, अनावश्यक हॉर्न वाजवू नये आणि सिग्नल तोडण्याचा प्रयत्न करू नये. दुचाकीस्वारांनी नेहमी दर्जेदार हेल्मेट वापरावे, तर चारचाकी वाहनातील चालक आणि प्रवाशांनी सीटबेल्ट लावणे बंधनकारक मानावे. वाहन चालवण्यापूर्वी वाहनाची स्थिती तपासावी आणि मद्यपान करून किंवा थकलेल्या अवस्थेत वाहन चालवणे टाळावे. या सर्व बाबींचे पालन केल्यास वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत राहते. सुरक्षित वाहतूक ही केवळ नियमांमुळे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या सजग आणि जबाबदार वर्तनामुळेच शक्य होते.

वाहतूक सिग्नल हे केवळ दिवे नसून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि जबाबदार वाहतुकीचे महत्त्वाचे साधन आहेत. प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघात कमी होतील, प्रवास सुरक्षित होईल आणि समाजात शिस्त व जबाबदारीची भावना अधिक दृढ होईल.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

# समाजाभिमुख व्यक्तिमत्व: सहशिक्षक बी. एन. रुद्रवाड

शिक्षक सेवानिवृत्त होतो; परंतु त्याचे ज्ञान, संस्कार आणि प्रेरणा कधीच सेवानिवृत्त होत नाहीत. समाजात असे काही शिक्षक असतात की, त्यांच्या अध्यापनाचा सुगंध अनेक पिढ्यांच्या आयुष्यात दरवळत राहतो. विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची गोडी निर्माण करणारे, प्रयोगातून शिक्षणाची नवी दिशा दाखवणारे, समाजसेवा आणि शिक्षण यांचा सुंदर संगम घडवणारे पंचवटी हायस्कूल, राहेर येथील ज्येष्ठ विज्ञान शिक्षक बाबुराव नरन्ना रुद्रवाड दि. ३१ जुलै २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ २६ वर्षांच्या सेवेला हा शब्दरूपी मानाचा मुजरा.

३ जुलै १९६८ रोजी नायगाव तालुक्यातील बरबडा या मातीत जन्मलेल्या रुद्रवाड यांनी ग्रामीण वातावरणात वाढत ज्ञानाची अखंड साधना केली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बरबडा येथून प्राथमिक शिक्षण, जवाहरलाल नेहरू विद्यालयातून माध्यमिक शिक्षण, यशवंत महाविद्यालय, नांदेड येथून उच्च माध्यमिक शिक्षण, एल.बी.एस. महाविद्यालय, धर्माबाद येथून बी.एस्सी., यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून एम.ए. (मराठी), नरहर कुरुंदकर महाविद्यालय, कौठा येथून शारीरिक शिक्षण पदविका आणि महात्मा फुले महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून बी.एड. ही व्यावसायिक पदवी संपादन करून त्यांनी स्वतःला सर्वांगसुंदर शिक्षक म्हणून घडविले.

ज्ञानाचा हा प्रवास पूर्ण झाल्यानंतर लोकनेते, माजी खासदार कै. गंगाधरराव देशमुख कुंटूरकर यांनी त्यांच्या गुणवत्तेची अचूक पारख करून सन २००० मध्ये कृष्णूर येथील जय भवानी माध्यमिक विद्यालयात त्यांना शिक्षक म्हणून संधी दिली. त्या संधीचे त्यांनी कर्तृत्वात रूपांतर



केले. सन २००७ पासून पंचवटी हायस्कूल, राहेर येथे त्यांनी ज्या निष्ठेने, समर्पणाने आणि विद्यार्थीहिताच्या भावनेने सेवा बजावली, त्यामुळे ते संस्थेचे केवळ शिक्षक नव्हे तर प्रेरणास्थान बनले.

विज्ञान हा विषय विद्यार्थ्यांना कठीण वाटू नये, तर तो अनुभवातून समजावा, ही त्यांची अध्यापनाची भूमिका होती. प्रयोग, निरीक्षण आणि प्रत्यक्ष कृती यांच्या माध्यमातून त्यांनी विज्ञानाला पुस्तकांच्या चौकटीतून बाहेर काढून विद्यार्थ्यांच्या जीवनाशी जोडले. म्हणूनच त्यांच्या वर्गात विज्ञान हा विषय नसून एक आनंददायी अनुभव बनत असे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारी जिज्ञासा आणि त्यांच्या डोळ्यांत दिसणारी चमक हीच त्यांच्या अध्यापनाची खरी कमाई ठरली.

रुद्रवाड सरांविषयी बोलताना विज्ञानप्रेमी, नवोपक्रमशील, प्रयोगनिष्ठ, विद्यार्थीप्रिय, सृजनशील, प्रेरणादायी अशी अनेक विशेषणे सहजपणे ओठांवर येतात. त्यांनी घडविलेले असंख्य विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून आपल्या यशामागील प्रेरणास्थान म्हणून आजही आपल्या गुरुंचे नाव आदराने घेतात. हीच एका शिक्षकाच्या आयुष्यातील सर्वात मोठी उपलब्धी होय. शिक्षणाइतकीच समाजसेवेचीही त्यांना ओढ आहे. सेवा सहकारी सोसायटी, बरबडा येथे संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळत आहेत, तसेच प्रेरणा खाजगी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पतसंस्था, कुंडलवाडी येथेही त्यांनी संचालक म्हणून प्रभावी कार्य केले. समाजाशी असलेली त्यांची नाळ कधीच तुटली नाही; उलट ती अधिक दृढ होत गेली.

आपल्या जीवनप्रवासात लाभलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग आहे. लोकनेते कै. गंगाधरराव देशमुख कुंटूरकर, राजेश देशमुख कुंटूरकर, बाळासाहेब धर्माधिकारी, काकाश्री तथा सेवानिवृत्त प्राध्यापक पेंटू गंगाराम रुद्रवाड, ज्येष्ठ बंधू दिगंबर नरन्ना रुद्रवाड (महाराज), सेवानिवृत्त मुख्याध्यापक व्यंकटराव नकाते, विद्यमान प्राचार्य एम. आर. मोरे, पर्यवेक्षक शिवानंद लाठकर तसेच एल. जी. पाटील यांच्याविषयी ते सदैव आदर आणि ऋणानुबंध व्यक्त करतात.

त्यांचे कौटुंबिक जीवनही तितकेच समृद्ध आहे. सन २००३ मध्ये खरबी (ता. भोकर) येथील सौ. सरस्वतीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना सुपुत्र डॉ. पवन (बी.ए.एम.एस.) आणि कन्या अक्षता, जी अभियांत्रिकी शिक्षण घेत आहे, अशी दोन गुणी अपत्ये आहेत. शिक्षण, संस्कार आणि मूल्यांची श्रीमंती त्यांनी आपल्या कुटुंबातही जोपासली आहे.

मनमिळावू, शांत, संयमी आणि प्रेमळ स्वभावामुळे रुद्रवाड यांचा मित्रपरिवार मोठा आहे. जुनी हिंदी भावगीते ऐकण्याचा त्यांचा छंद त्यांच्या रसिक मनाची साक्ष देतो. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची त्यांची वृत्ती प्रत्येकाला प्रेरणा देणारी आहे.

सेवानिवृत्तीनंतर धार्मिक कार्य, समाजसेवा आणि लोकहिताची कामे करण्याचा त्यांचा मानस आहे. आयुष्यभर शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविणाऱ्या या शिक्षकाची समाजसेवेची वाटचाल पुढेही तितक्याच उत्साहाने सुरू राहील, याची खात्री वाटते.

मलाही त्यांच्यासोबत काही काळ कार्य करण्याचा योग आला. त्या काळात मी त्यांना दूरदृष्टी असलेले, कर्तव्यदक्ष, विज्ञाननिष्ठ, चिकित्सक वृत्तीचे आणि अत्यंत संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून अनुभवले. विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची आत्मीयता आणि सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे वैभव आहे. आज ते शिक्षकी सेवेतून निवृत्त झाले तरी त्यांनी पेरलेले ज्ञान, दिलेले संस्कार आणि जागविलेली वैज्ञानिक दृष्टी पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. शिक्षक म्हणून त्यांनी जे आयुष्य जगले, तेच त्यांच्या कार्याची सर्वात मोठी ओळख आहे.

पंचवटी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, राहेर परिवारातर्फे बाबुराव नरन्ना रुद्रवाड यांना सेवानिवृत्तीच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांचे पुढील आयुष्य निरामय, आनंदमय, समृद्ध, दीर्घायुषी आणि समाजहिताच्या कार्याने उजळून निघो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. शिक्षक निवृत्त होतो; पण त्याने प्रज्वलित केलेली ज्ञानज्योत कायम प्रकाश देत राहते. सुभास्ते पन्थानः सन्तु।।

**-संजय ठिकाणे पाटील**
नांदेड

# माय भारततर्फे 'नशामुक्त युवा-विकसित भारत' संकल्प अभियान उत्साहात संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारत सरकारच्या मेरा युवा भारत नांदेड यांच्या वतीने 'नशामुक्त युवा, विकसित भारत' संकल्प अभियानाचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील समाजशास्त्र विभागाच्या सहकार्याने २ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आयोजित करण्यात आले. कार्यक्रमास २०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारोती गायकवाड तसेच जिल्हा युवा अधिकारी अशनी अनिल कनकटे उपस्थित होत्या.

थेट प्रक्षेपणाद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील युवकांना व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी पुढील १०० रविवार विविध जनजागृती उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान देण्याचा संदेश दिला. त्यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी 'नशामुक्त युवा-विकसित भारत' संकल्पाची शपथ घेतली.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी युवकांची सामाजिक जबाबदारी, व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व आणि राष्ट्रनिर्मितीत युवकांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता अधोरेखित केली. डॉ. मारोती गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

जिल्हा युवा अधिकारी, अशनी अनिल कनकटे यांनी मार्गदर्शन करताना व्यसनमुक्ती ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक चळवळ असून प्रत्येक युवकाने समाजात जनजागृती करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे बंडू कांबळे, सिस्टीम एक्सपर्ट विभागाचे विजय हनवते, सह्याद्री पगडे, नरसिंग कागडा तसेच विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी, स्वयंसेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी मोलाचे सहकार्य केले.

माय भारतच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत व्यापक जनजागृती निर्माण करत 'विकसित भारत' घडविण्याच्या राष्ट्रीय संकल्पाला बळकटी दिली.

## बरबडा-मांजरम-कुंटूर परिसरात पावसाची दमदार हजेरी, खरीप पिकांना मिळाली नवसंजीवनी

**बरबडा (प्रतिनिधी)**– गेल्या २० ते २५ दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्यामुळे चिंतेत असलेल्या बरबडा, मांजरम व कुंटूर परिसरातील शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. दिनांक २९ आणि ३० जुलै रोजी झालेल्या दमदार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीला या भागात चांगला पाऊस झाला होता. मात्र त्यानंतर सलग वीस पंचवीस दिवस अत्यल्प प्रमाणात रिमझिम सरी कोसळत असल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला होता. त्यामुळे उडीद, मूग, हळद, तूर, कापूस आणि सोयाबीनसह इतर खरीप पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होत होता. अनेक शेतांतील पिके कोमेजण्याच्या अवस्थेत पोहोचली होती.

पिकांच्या भविष्याबत चिंताग्रस्त झालेल्या शेतकरी वर्ग मोठ्या आशेने आकाशाकडे डोळे लावून बसला होता. अखेर बुधवार दि. २९ आणि गुरुवार दि. ३० जुलै रोजी सायंकाळी ५ ते ९ वाजण्याच्या दरम्यान वरुणराजाने या परिसराला चांगले झोडपून काढले.

या सुखद पावसामुळे शेतात पुन्हा ओलावा निर्माण झाला आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीस मोठा आधार मिळाला आहे. सलग दोन महिने पावसाळा उलटून गेल्यानंतर झालेल्या या पावसामुळे भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही वाढ होण्यास मदत झाली आहे. एकंदरीत या दमदार पावसामुळे शेतकरी वर्गाने सुटकेचा निश्वास सोडला असून यंदाच्या खरीप हंगामाबाबत आशा निर्माण झाली आहे.

## नीट पेपर फुटी, एमएचटी-सीईटी चुकीची पर्सेंटाइल पद्धत रद्द करण्याच्या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचे धरणे आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)**– एमपीएससीपेपर फुटी, एमएचटी-सीईटी परीक्षा घोटाळा व त्यामधील निवड प्रक्रियेतील पर्सेंटाईल पद्धत चुकीची असणे, शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी परीक्षा कायमची रद्द करणे व सर्व निवडप्रक्रियातील ऑनलाईन परीक्षा कायम रद्द करून ऑफलाईन घेणे या व ईतर मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलकांनी निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविले. या निवेदनात म्हटले की, सरकारने जर ताबडतोब पाऊल उचलून दोषी व्यक्तींवर कारवाई केली नाही तर संभाजी ब्रिगेडला यापेक्षा आक्रमक आंदोलन करावे लागेल व त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर राहील.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, जिल्हाध्यक्ष जेजेराव शिंदे, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, महानगराध्यक्ष अशोक कदम, अंकुश कोल्हे, कुंडलिक शिंदे, सुरज पाटील, दिलीप दळवी, नितीन कोकाटे, अनिल दापके, प्रदीप गुब्रे, सुरेश एलबुगडे, बालाजी जाधव, गोविंद गाडे, संतोष चिद्रावार, बालाजी देशमुख, शहाजी बाबरे, ज्ञानेश्वर पवार, विरोचन बनबरे, परमानंद खिल्लारे यांच्यासह संभाजी बिग्रेडचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'विकली टेस्ट' बुडवू देऊ नये; चार महिन्यांतच सीईटी, पालकांनी जागरूक रहावे -शिवाजीराजे पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)**–नीट, जेईई आणि सीईटीसारख्या प्रवेश परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलेज किंवा कोचिंग क्लासेसमध्ये घेतल्या जाणाऱ्या विकली टेस्ट कोणत्याही परिस्थितीत बुडवू देऊ नयेत. अभ्यास पूर्ण झाला नसला तरी नियमित टेस्ट देणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. इंजिनिअरिंग सीईटीला अवघे चार महिने, तर नीट परीक्षेला केवळ नऊ महिन्यांचा कालावधी शिल्लक असल्याने पालकांनी विद्यार्थ्यांच्या तयारीबाबत सजग राहून महिन्यातून किमान एकदा कॉलेज व कोचिंग क्लासेसला भेट द्यावी, असे आवाहन सुप्रसिद्ध स्टुडंट-पॅरेंट काऊन्सिलर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले.

एलकेएम ज्ञानांगण कॅम्पसच्या वतीने नीट, जेईई व सीईटीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आयोजित जागरूक पालकत्व या विशेष सत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि जिजाऊ वंदनेने झाली. यावेळी प्रा. डॉ. नामदेव दळवी, प्रा. शंकर घोडके, प्रा. मीना दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित पालकांशी संवाद साधताना शिवाजीराजे पाटील म्हणाले की, परीक्षेपर्यंतचा प्रत्येक दिवस महत्त्वाचा आहे. अभ्यास कमी झाला असला तरी विकली टेस्ट कधीही चुकवू नका. प्रत्येक टेस्ट विद्यार्थ्याला स्वतःचे मूल्यमापन करण्याची आणि चुका सुधारण्याची संधी देते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, यापुढे विद्यार्थ्यांनी आरोग्याची विशेष काळजी घेत आजारी पडणे टाळावे. योग्य आहार, पुरेशी झोप आणि नियमित योग, प्राणायाम व ध्यान यामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि मानसिक क्षमता वाढते. यासोबतच विद्यार्थी मोबाईलपासून जितके दूर राहतील तितकेच यशाच्या जवळ पोहोचतील.

विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय असेल तर अपेक्षित यश मिळविणे अवघड नाही. पालकांनी केवळ अभ्यासाकडेच नव्हे, तर मुलांच्या संगतीकडे, शिस्तीकडे आणि दैनंदिन दिनचर्येकडेही लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतल्यास स्पर्धा परीक्षांमध्ये उज्ज्वल यश संपादन करता येते, असे त्यांनी सांगितले.

## डॉ. अण्णाभाऊ साठे हे मार्क्सवाद आणि संविधानवादाचे सुरेख मिश्रण -डॉ. बी. एस. वाघमारे



**नांदेड (प्रतिनिधी)**– साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रत्येक साहित्य कलाकृतीत मानवतावाद, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि समतामूलक समाजाच्या निर्मितीची मूल्य आहेत. समकालीन साहित्यिकांनी अण्णाभाऊंच्या साहित्याकडे दुर्लक्ष केले; मात्र निर्वाणानंतर ते वैश्विक साहित्यिक आहेत हे सर्व जगाने मान्य केले आहे. डॉ. अण्णाभाऊ साठे हे मार्क्सवाद आणि संविधानवादाचे सुरेख मिश्रण असल्याचे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथील राज्यशास्त्राचे सेवानिवृत्त डॉ. बी. एस. वाघमारे यांनी केले.

यशवंत महाविद्यालयात साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेत 'अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीची समीक्षा' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

याप्रसंगी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा पुरोगामी व स्त्रीवादी विचारवंत व वक्ते डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. साईनाथ शाहू, डॉ. हनुमंतलू तमलूरकर यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. बी. एस. वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. अण्णाभाऊंच्या लेखनाने प्रेरित होऊन लेखन करावे, असे आवाहन केले. तंत्रज्ञानाच्या अतिवापराने हस्तलेखन मागे पडत असल्याने तरुणांचा सर्वांगीण बौद्धिक विकास खुंटला आहे. निश्चितच तंत्रज्ञानाचा प्रत्येक क्षेत्रात वापर व्हावा; मात्र स्वहस्तलेखन विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे. डॉ. अण्णाभाऊंनी लेखनाद्वारे क्रांतीचे तत्व जनमानसात रुजविले, यासाठी विद्यार्थ्यांवर लेखनाचे संस्कार व्हावे, असे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. कविता सोनकांबळे यांनी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षित, दुर्लक्षित स्त्रीला आपल्या प्रत्येक ग्रंथाची नायिका बनविले. डॉ. अण्णाभाऊंनी विश्वामध्ये परिवर्तन करण्यासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारक मार्गाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. तसेच श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा आणि अंधश्रद्धेविरुद्ध मानसिकता तयार करण्यासाठी कष्टकरी, कामगार यांच्या तळहातावर विश्व तरलेले आहे, असे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कु. मोहिनी लिंगायत, प्रमुख अतिथींचा परिचय कु. समीक्षा वाघमारे आणि शेवटी आभार डॉ. साईनाथ शाहू यांनी मानले.

## महानगरपालिकेत क्रांतीसिंह नाना पाटील जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेते, प्रतिसरकारचे संस्थापक आणि थोर स्वातंत्र्यसेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त दि. ३ ऑगस्ट रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये त्यांच्या प्रतिमेस मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे दि. ३ ऑगस्ट हा भारतीय अवयवदान दिन म्हणून साजरा करण्यात येत असल्याने यावेळी अवयवदानाच्या प्रतिज्ञेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

क्रांतीसिंह नाना पाटील हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक अतुलनीय आणि झुंझार स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व समाजसुधारक होते. ब्रिटिश राजवटीला समांतर अशी 'प्रतिसरकार' यंत्रणा यशस्वीपणे राबवून त्यांनी सातारा-सांगली भागात इंग्रज सत्तेला मोठा हादरा दिला होता. गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचा हाच क्रांतीचा आणि समाजसेवेचा वारसा आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

## साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती भोकरमध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी



**भोकर (प्रतिनिधी)**– लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती भोकर शहरात रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, आदींसह विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी बोरगाव रस्त्यावर अण्णाभाऊ साठे चौक, शास्त्रीनगर, शहीद प्रफुल्लनगर, मातंगवाडा येथे नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. लहुजी साळवे चौकात पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्रीकृष्ण वाचनालयात लेखन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. मातंगवाडा येथे वृक्षारोपण, व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तेली गल्ली येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रक्तदान शिबिरात ४० जणांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना गौरविण्यात आले. नगरपरिषद कार्यालय, समतानगर यासह शहरातील विविध भागात सामाजिक उपक्रमांनी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, बांधकाम सभापती योगेश भोकरकर, महंत प्रभाकरबाबा कपाटे, गणेश यशवंतकर, नगरसेवक साईप्रसाद जटलावार, डॉ. बालाजी आंदबोरीकर, डॉ. मनोज गिमेकर, दिनेश लक्षटवार, गौतम कसबे, अविनाश वाघमारे, सिध्देश्वर पिटलेवाड, राजेश वाघमारे, उत्तम बाबळे, नामदेव वाघमारे, के. व्ही. देवकांबळे, बालाजी वाघमारे, अनिल डोईफोडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## बीएच सिरीज वाहनधारकांनी कर भरण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– बीएच (भारत) सिरीज अंतर्गत नोंदणीकृत वाहनधारकांनी थकीत वाहन कर तातडीने भरावा, अन्यथा विशेष तपासणी मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांनी केले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, बीएच सिरीज वाहनांचा कर नोंदणीवेळी दोन वर्षांसाठी स्वीकारला जातो. त्यानंतर प्रत्येक दोन वर्षांनी वाहनाचा कर भरणे बंधनकारक आहे. कर भरण्याची मुदत संपल्यानंतर सात दिवसांचा ग्रेस पिरियड दिला जातो. त्यानंतरही कर न भरल्यास प्रतिदिन १०० रुपये दंड आकारला जातो.

कार्यालयाच्या संगणकीय अभिलेखांनुसार सध्या काही बीएच सिरीज वाहनांचा कर थकीत असून संबंधित वाहनधारकांनी विलंब न करता थकीत कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**-: CHANGE IN NAME :-**

My old Name is **MOHMED RAFEEQ** Which now I am Changing as New Name **MOHMED RAFEEQ MOHMED ISMAIL** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

: Address :
H.NO. 9-7-398, IMRAN COLONY,
TIPU SULTAN ROAD, ITWARA,
NANDED. 431604
Mob. 7972829471

**-: CHANGE IN NAME :-**

My old Name is **MOHAMMED SAJEED BAGWAN** Which now I am Changing as New Name **MOHAMMED SAJEED MOHAMMED ISMAIL BAGWAN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

: Address :
H.NO. 9-7-398, IMRAN COLONY,
NEAR IQRA SCHOOL,
ITWARA, NANDED. 431604
Mob. 9673648331

**-: CHANGE IN NAME :-**

My old name is **Kadam Baby Madhavrao.** I have changed my name to Sunanda Suresh Jadhav.

Henceforth, I shall be known and identified by the **name Sunanda Suresh Jadhav** for all purposes, including obtaining/re-issuing my passport, and in all official, legal, financial, and personal records.

Signed by/-
Sunanda Suresh Jadhav
(Formerly known as Kadam Baby Madhavrao)

:Address:
15-B, Somesh Nagar, Near government rest house.
Nanded 431602 Mobile 7709623384

**-: CHANGE IN NAME :-**

My old Name is **AMENA SHIRIN SYEED UDDIN** Which now I am Changing as New Name **AMENA SHIREEN ABDUL WASEEM** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

: Address :
NEAR OLD WATER TANK
KHADAKPURA, NANDED. 431601
MAHARASHTRA-INDIA
Mob. 8446448771

**-: CHANGE IN NAME :-**

My old name is **DHUNDI SHAIKH HYDER ABDUL KARIMSAB** which now I change as new name **DHUNDI SK HYDER ABDUL KARIM** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

: Address :
Tagline Galli Mukhed
Tq. Mukhed, Dist. Nanded
Mobile no.9860313284

**-: CHANGE IN NAME :-**

My old Name is **SYEEDUDDIN** Which now I am Changing as New Name **MOHAMMAD SAYEEDUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

: Address :
RAHEMAT NAGAR NANDED
Mob No. 8329823339

Licence No. UBD.MAH.1341 P. | Regd No. NND/NND/BNK/0/330/96

**SHANKAR NAGARI SAHAKARI BANK LTD. NANDED.**

H.O. : "POKARNA COMPLEX" New Mondha, Nanded-431602 (Maharashtra)
Ph. 02462-284455

Madhukarrao S. Deshmukh, Vice-Chairman | Vikram D. Raje, C.E.O./G.Manager | Omprakash G. Pokarna (Ex.MLA), F.Chairman/Chairman

जा.क्र. SNSB/HO/30/402A/NND | दिनांक : 30 जुलै 2026

**संचालक मंडळ सभेची नोटीस**

शंकर नागरी सहकारी बँक लि.नांदेड या बँकेच्या सर्व संचालकांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार बँकेच्या सभासदामधुन नैमितिक रिक्त सर्वसाधारण मतदार संघातील दोन (02) व महिला राखीव मतदार संघातील (01) असे एकुण (03) संचालक पदाच्या निवडीकरिता प्राधिकृत अधिकारी श्री के.एस.बारकुल, सहाय्यक निबंधक (प्रशासन) संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 11:00 वाजता शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड या बँकेचे मुख्य कार्यालय HO Pokarna Complex, New Mondha, Nanded-431602 (Maharashtra) या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालक मंडळ सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत सर्व सभासदांमधुन निवडावयाच्या संचालकांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे निवडणुक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणुक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| 1 | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सकाळी 11:00 ते सकाळी 11:30 |
| 2 | नामनिर्देशन पत्र छाननी | सकाळी 11:30 ते दुपारी 12:00 |
| 3 | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी 12:00 |
| 4 | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी 12:00 ते दुपारी 12:30 |
| 5 | अंतिम उमेदवाराची यादी जाहिर करणे | दुपारी 12:30 |
| 6 | मतदार प्रक्रिया | दुपारी 12:30 ते दुपारी 1:30 |
| 7 | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी 1:30 ते दुपारी 2:00 |
| 8 | निवडुन आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे | दुपारी 02:00 वाजता |

**(टिप :- निवडणुक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील)**

दिनांक :-30.07.2026
ठिकाण :- नांदेड

स्वाक्षरीत/-
सी.ई.ओ./एम.डी.
शंकर नागरी सहकारी बँक लि., नांदेड

निरोगी आरोग्याचा कानमंत्र
निरामय



# फक्त धूळच नाही, पावसाचे थेंबही वाढवू शकतात अस्थमा!

## पावसाळ्यात ही काळजी घेतल्यास त्रास कमी होईल...

**पावसाळा सुरू झाला की उकाड्यापासून दिलासा मिळतो. मात्र, अस्थमा असलेल्या रुग्णांसाठी हा ऋतू अनेकदा त्रासदायक ठरतो. हवेत वाढलेला आर्द्रपणा (Humidity), परागकण (Pollen), बुरशीचे बीजाणू (Fungal Spores) आणि हवामानातील अचानक होणारे बदल यांमुळे अस्थमाचा झटका येण्याचा धोका वाढू शकतो. पावसाळ्यात वाढणारा आर्द्रपणा, परागकण आणि बुरशी अस्थमाची लक्षणे तीव्र करू शकतात. मात्र, योग्य काळजी घेतल्यास हा धोका बऱ्याच प्रमाणात कमी करता येतो.**

### पावसाळ्यात अस्थमाचा त्रास का वाढतो?

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माहितीनुसार, जगभरात सुमारे २६ कोटी लोक अस्थमाने ग्रस्त आहेत. मान्सूनच्या काळात या रुग्णांचा त्रास अधिक वाढतो. तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यातील वाढलेला आर्द्रपणा आणि थंड हवा श्वसनमार्गात सूज निर्माण करू शकतात. याशिवाय पावसामुळे साचलेले पाणी, हवेत पसरलेले परागकण आणि बुरशीचे बीजाणू यांमुळे ॲलर्जी होऊन श्वास घेण्यास त्रास सुरू होऊ शकतो.

### कोणती काळजी घ्यावी?

- अस्थमा वाढवणारे घटक ओळखा.
- अतिथंड पाणी किंवा थंड पदार्थ टाळा.
- धूळ, बुरशी, धूर किंवा तीव्र सुगंधामुळे त्रास होत असल्यास त्यापासून दूर राहा.

### सुरुवातीची लक्षणे

- सर्दी किंवा खोकला
- थकवा जाणवणे
- छातीत जडपणा
- श्वास घेण्यास त्रास
- ही लक्षणे अनेकदा अस्थमाचा झटका येण्यापूर्वी दिसून येतात.

### ही काळजी घ्या...

- औषधे आणि इनहेलर नियमित वापरा.
- डॉक्टरांनी सांगितलेल्या वेळेनुसार औषधे घ्या.
- इनहेलर नेहमी जवळ ठेवा.
- औषधांच्या वेळा चुकवू नका.
- पावसात भिजणे शक्यतो टाळा.
- संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.
- नियमित श्वसनाचे व्यायाम (Breathing Exercises) करा.
- बाहेर जाताना मास्क वापरा.
- घर स्वच्छ आणि कोरडे ठेवा.

- डिओडरंट, परफ्यूम किंवा तीव्र सुगंध असलेल्या वस्तूंचा वापर मर्यादित ठेवा. पाळीव किंवा इतर प्राण्यांच्या अतिजवळ जाणे टाळा, कारण काही वेळा त्यामुळे ॲलर्जी किंवा संसर्गाचा धोका वाढू शकतो. पावसाळ्यात अस्थमा रुग्णांसोबतच ॲलर्जीचा त्रास असलेल्या व्यक्ती, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनीही विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. हवामानातील बदल, वाढलेला आर्द्रपणा, परागकण, बुरशी आणि व्हायरल संसर्ग यामुळे श्वसनाचे आजार बळावू शकतात. अस्थमाची लक्षणे वाढत असल्यास किंवा श्वास घेण्यास सतत त्रास होत असल्यास विलंब न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### अस्थमा वाढण्यामागील इतर कारणे...

- केवळ आर्द्रपणा किंवा परागकणच नव्हे तर इतरही अनेक कारणांमुळे अस्थमाचा त्रास वाढू शकतो.
- घरातील धूळ आणि बुरशी : पावसाळ्यात लोक जास्त वेळ घरात राहतात. घरातील धुळीचे कण, पाळीव प्राण्यांच्या अंगावरील केस किंवा त्वचेचे सूक्ष्म कण आणि ओलाव्यामुळे वाढणारी बुरशी अस्थमाची लक्षणे वाढवू शकतात.
- श्वसनमार्ग अधिक संवेदनशील होणे : हवामानातील बदलांमुळे श्वसनमार्ग अधिक संवेदनशील बनतात, त्यामुळे किरकोळ ॲलर्जीही अस्थमा वाढवू शकते.
- हवेच्या दाबातील बदल : मान्सूनमध्ये तापमान आणि आर्द्रपणात सतत चढ-उतार होत असल्याने हवेचा दाब बदलतो. त्यामुळे फुफ्फुसांना श्वास घेण्यासाठी अधिक मेहनत करावी लागू शकते.
- व्हायरल संसर्गाचा धोका : पावसाळ्यात सर्दी, खोकला, फ्लू यांसारख्या संसर्गांचे प्रमाण वाढते. हे आजार अस्थमाच्या रुग्णांसाठी धोकादायक ठरू शकतात.

### मेघगर्जनेमुळेही अस्थमाचा झटका येऊ शकतो

NCBIमध्ये प्रकाशित संशोधनानुसार, २०१६ मध्ये ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे झालेल्या तीव्र मेघगर्जनेसह पावसादरम्यान सुमारे ९,००० अस्थमा रुग्णांना श्वास घेण्यास गंभीर त्रास झाला होता. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले आणि या घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला होता. हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या माहितीनुसार, या प्रकाराला थंडरस्टॉर्म अस्थमा (Thunderstorm Asthma) असे म्हणतात. मेघगर्जनेदरम्यान परागकणांचे अतिसूक्ष्म तुकडे हवेत मोठ्या प्रमाणात पसरतात. त्यामुळे हे फीव्हर (Hay Fever), ॲलर्जिक राइनायटिस, वारंवार शिंक येणे, डोळ्यांना खाज येणे आणि अस्थमाचा झटका येण्याचा धोका वाढतो. सामान्यतः पावसामुळे हवेतले परागकण कमी होतात, असे मानले जाते. मात्र, जर्नल ऑफ अप्लाइड मेटेरॉलॉजी अँड क्लायमेटॉलॉजीमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, मेघगर्जनेच्या वेळी अस्थमा रुग्णांचा त्रास उलट वाढू शकतो.



# धूसर दिसतेय का?

## UV किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करा; या 6 सवयींमुळे मोतीबिंदूचा धोका कमी होऊ शकतो

**मोतीबिंदू (Cataract) हा जगभरात दृष्टी कमी होण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. वाढते वय हे त्यामागील सर्वात सामान्य कारण असले, तरी मधुमेह, धूम्रपान, दीर्घकाळ तीव्र उन्हात राहणे, स्टेरॉइड औषधांचा दीर्घकाळ वापर आणि अस्वास्थ्यकर जीवनशैली यामुळेही मोतीबिंदूचा धोका वाढू शकतो. एकदा मोतीबिंदू तयार झाल्यानंतर तो औषधांनी पूर्णपणे बरा होत नाही. मात्र, अनेक वैज्ञानिक संशोधनांनुसार आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब केल्यास त्याची प्रगती मंदावण्यास मदत होऊ शकते.**

मोतीबिंदूमध्ये डोळ्याच्या नैसर्गिक भिंगामध्ये (लेन्स) धूसरपणा निर्माण होतो. त्यामुळे प्रकाश स्पष्टपणे आत जाऊ शकत नाही आणि दृष्टी हळूहळू कमी होत जाते. काही चांगल्या सवयी अंगीकारल्यास या प्रक्रियेचा वेग कमी करता येऊ शकतो. मात्र, मोतीबिंदू पूर्णपणे दूर करण्यासाठी आवश्यकतेनुसार शस्त्रक्रियाच प्रभावी उपचार मानली जाते. डोळ्याचे नैसर्गिक भिंग मुख्यतः प्रथिने आणि पाण्यापासून बनलेले असते. वय वाढल्यानंतर या प्रथिनांच्या रचनेत बदल होऊ लागतो. ती एकमेकांना चिकटून भिंग धूसर बनवतात आणि त्यातून मोतीबिंदू तयार होतो. याशिवाय मधुमेह, डोळ्याला झालेली दुखापत, स्टेरॉइड औषधांचा दीर्घकाळ वापर, अतिनील (UV) किरणांचा जास्त संपर्क, धूम्रपान आणि आनुवंशिक कारणे यामुळे मोतीबिंदूचा धोका आहे. अमेरिकन अकॅडमी ऑफ ऑप्थॅल्मोलॉजीच्या मते, वाढते वय हा सर्वात मोठा जोखीम घटक असला तरी जीवनशैलीशी संबंधित अनेक बाबीही मोतीबिंदूच्या प्रगतीवर परिणाम करतात.

### जीवनशैली बदलल्याने फरक पडतो का?

- तज्ज्ञांच्या मते, कोणताही घरगुती उपाय किंवा विशिष्ट आहार मोतीबिंदू पूर्णपणे दूर करू शकत नाही. मात्र, अनेक संशोधनांनुसार आरोग्यदायी जीवनशैलीमुळे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी होतो आणि डोळ्यांच्या पेशींचे नुकसान टाळण्यास मदत मिळते. त्यामुळे मोतीबिंदूची वाढ काही प्रमाणात मंदावू शकते. नॅशनल आय इन्स्टिट्यूटच्या मते, डोळ्यांचे संरक्षण, संतुलित आहार आणि नियमित नेत्रतपासणी यांना विशेष महत्त्व आहे.
- डोळ्यांचे UV किरणांपासून संरक्षण करा : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ (NIH) च्या माहितीनुसार, सूर्याच्या अतिनील (UV) किरणांमुळे डोळ्यांच्या भिंगाचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान वाढू शकते. दीर्घकाळ उन्हात राहावे लागत असल्यास UV400 संरक्षण असलेले सनग्लासेस आणि रुंद कडा असलेली टोपी वापरणे फायदेशीर ठरते. सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत तीव्र उन्हात डोळ्यांचे अतिरिक्त संरक्षण करणे आवश्यक आहे.
- मधुमेह आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा : अमेरिकन डायबिटीज असोसिएशनच्या मते, सतत वाढलेली रक्तातील साखर डोळ्याच्या भिंगामध्ये बदल घडवू शकते आणि मोतीबिंदू लवकर होण्याचा धोका वाढवते. मधुमेहींनी HbA1c नियंत्रणात



ठेवणे, संतुलित आहार घेणे आणि नियमित तपासणी करून घेणे आवश्यक आहे.
- अँटिऑक्सिडंटयुक्त आहार घ्या : अमेरिकन असोसिएशन ऑफ ऑप्थॅल्मोलॉजीच्या माहितीनुसार, हिरव्या पालेभाज्या, संत्री, पेरू, ढोबळी मिरची, गाजर, टोमॅटो, बदाम आणि अक्रोड यामध्ये व्हिटॅमिन C, व्हिटॅमिन E, ल्युटीन आणि झिअॅक्सँथिन यांसारखे अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक डोळ्यांचे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.
- धूम्रपान पूर्णपणे सोडा : तज्ज्ञांच्या मते, सिगारेटच्या धुरामुळे शरीरात फ्री रॅडिकल्सचे प्रमाण वाढते. त्यामुळे डोळ्यांच्या भिंगाचे नुकसान होऊन मोतीबिंदूचा धोका वाढू शकतो. धूम्रपान सोडल्यास केवळ डोळ्यांचेच नव्हे, तर हृदय आणि फुफ्फुसांचे आरोग्यही सुधारते.
- नियमित नेत्रतपासणी करा : NIHच्या मते, वयाच्या ४० वर्षांनंतर किंवा कुटुंबात डोळ्यांच्या आजारांचा इतिहास असल्यास नियमित नेत्रतपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. सुरुवातीच्या टप्प्यात मोतीबिंदूचे निदान झाल्यास डॉक्टर त्याच्या प्रगतीवर लक्ष ठेवू शकतात आणि योग्य वेळी शस्त्रक्रियेचा सल्ला देऊ शकतात.

### स्टेरॉइड औषधे दीर्घकाळ वापरू नका...

नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन (NCBI)च्या माहितीनुसार, स्टेरॉइड गोळ्या, इंजेक्शन किंवा आय ड्रॉप्सचा दीर्घकाळ वापर काही व्यक्तींमध्ये मोतीबिंदूचा धोका वाढवू शकतो. म्हणूनच अशी औषधे केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच घ्यावीत. दीर्घकाळ स्टेरॉइड उपचार सुरू असल्यास नियमित डोळ्यांची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. मोतीबिंदू हा वाढत्या वयाबरोबर आढळणारा सामान्य डोळ्यांचा आजार असला, तरी त्याच्या प्रगतीस कारणीभूत ठरणारे अनेक जोखीम घटक नियंत्रित करता येतात. UV किरणांपासून संरक्षण, रक्तातील साखरेवर नियंत्रण, पौष्टिक आहार, धूम्रपानापासून दूर राहणे, नियमित नेत्रतपासणी आणि स्टेरॉइड औषधांचा विवेकपूर्ण वापर यांमुळे डोळ्यांचे आरोग्य दीर्घकाळ चांगले राहण्यास मदत होऊ शकते. मात्र, मोतीबिंदूमुळे दैनंदिन कामकाजात अडथळा निर्माण होऊ लागल्यास मोतीबिंदूची शस्त्रक्रिया हा सर्वात सुरक्षित आणि प्रभावी उपचार मानला जातो.



# मांजर पाळत असाल तर सावध व्हा! 'कॅट स्क्रॅच डिसीज'ची लक्षणे नका करू दुर्लक्षित

**अलीकडच्या काळात अनेक जण मांजर पाळण्याचा छंद जोपासत आहेत. मात्र, मांजरांच्या संपर्कामुळे होणाऱ्या 'कॅट स्क्रॅच डिसीज' (Cat Scratch Disease) या आजाराविषयी अनेकांना पुरेशी माहिती नाही. हा आजार काही रुग्णांसाठी गंभीर ठरू शकतो. कोलकाता येथील एका ८ वर्षीय मुलाला या संसर्गामुळे व्हेंटिलेटरवर ठेवण्याची वेळ आली होती. सुदैवाने, योग्य वेळी निदान झाल्यामुळे त्याचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना यश आले.**



### सर्व तपासण्या निष्फळ ठरल्या

दक्षिण कोलकात्यातील ८ वर्षीय मुलाला १० जुलै रोजी गंभीर मज्जासंस्थेशी संबंधित आजारामुळे पिअरलेस रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात (ICU) दाखल करण्यात आले होते. त्याला वारंवार झटके (Seizures) येत होते. झटक्यांचे नेमके कारण शोधण्यासाठी विविध निदान चाचण्या करण्यात आल्या; मात्र सर्व तपासण्या निष्फळ ठरल्या. अखेरीस त्याला व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. डॉक्टरांनी सखोल चौकशी केल्यानंतर मुलाच्या पालकांकडून महत्त्वाची माहिती मिळाली. मुलाच्या जवळ एक मांजर नेहमी झोपत असे. त्यानंतर डॉक्टरांना कॅट स्क्रॅच डिसीजचा संशय आला. हा आजार बार्टोनेला (Bartonella) या जीवाणूमुळे होतो. संक्रमित मांजराने ओरखडा काढल्यास किंवा चावा घेतल्यास हा संसर्ग होऊ शकतो. उपचार सुरू असूनही मुलाला झटके येणे थांबत नव्हते आणि औषधांचाही अपेक्षित परिणाम होत नव्हता.

### बार्टोनेला संसर्गाचे निदान

उपचारादरम्यान मुलाला तापही आला. त्यानंतर पालकांनी सांगितले की, झटके सुरू होण्याच्या सुमारे १० दिवस आधी त्याच्या पायावर गुलाबी रंगाचे पुरळ उठले होते आणि डाव्या काखेतील लिम्फ नोड्सना सूज आली होती. या लक्षणांवरून डॉक्टरांना कॅट स्क्रॅच डिसीजचा संशय अधिक बळावला. त्यानंतर करण्यात आलेल्या अँटीबॉडी चाचणीत बार्टोनेला संसर्ग असल्याचे स्पष्ट झाले. बार्टोनेला हा जीवाणूंचा एक समूह असून, तो प्रामुख्याने प्राण्यांच्या ओरखड्यांमुळे, चाव्यामुळे किंवा काही कीटकांमुळेही पसरू शकतो. योग्य उपचारानंतर रुग्णालयात दाखल झाल्यानंतर दहा दिवसांनी मुलाची प्रकृती सुधारली आणि त्याला घरी सोडण्यात आले.

### कॅट स्क्रॅच डिसीजची लक्षणे...

- मांजराने चावा घेतलेल्या किंवा ओरखडा काढलेल्या जागेवर सूज येणे आणि जखम लवकर न भरणे.
- लिम्फ नोड्समध्ये वेदना व सूज येणे. हाताला ओरखडा लागल्यास काखेत, तर पायाला ओरखडा लागल्यास जांघेतील लिम्फ नोड्स सुजणे.
- डोकेदुखी, भूक कमी लागणे, थकवा, सांधेदुखी आणि ताप यांसारखी फ्लूसदृश लक्षणे.
- ओरखड्याच्या जागी पूयुक्त फोड किंवा जखम तयार होणे.

### हा आजार धोकादायक का ठरू शकतो?

- जॉन्स हॉपकिन्स मेडिसिनच्या माहितीनुसार, ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे, अशा व्यक्तींमध्ये कॅट स्क्रॅच डिसीजमुळे गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. निरोगी प्रौढ व्यक्तींमध्ये हा आजार सहसा गंभीर स्वरूप धारण करत नाही. या संसर्गामुळे पुढील गुंतागुंत होऊ शकते.
- बॅसिलरी अँजिओमॅटोसिस (Bacillary Angiomatosis) : त्वचेचा दुर्मिळ विकार असून अंतर्गत अवयवांवरही परिणाम करू शकतो.
- पॅरिनॉड ऑक्युलोग्लॅंड्युलर सिंड्रोम : डोळे आणि लिम्फ नोड्सवर परिणाम करणारी अवस्था.
- एंडोकार्डायटिस (Endocarditis) : हृदयाच्या आतील अस्तराला संसर्ग होऊन गंभीर हृदयविकाराचा धोका निर्माण होऊ शकतो.

### काय काळजी घ्यावी?

- मांजराने ओरखडा काढल्यास किंवा चावा घेतल्यास जखम तातडीने साबण व स्वच्छ पाण्याने धुवावी.
- जखमेवर लालसरपणा, सूज, ताप किंवा लिम्फ नोड्स सुजल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
- रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेल्या व्यक्तींनी मांजरांच्या ओरखड्यांपासून विशेष काळजी घ्यावी.
- पाळीव प्राण्यांची नियमित आरोग्य तपासणी व स्वच्छता राखावी.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६
उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)
खालील सूचनेसह कलम १५४ अन्वये निवेश
एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन
नियमावलीचे विनियम ६.३ तक्ता ६ जी खालील
टिप (v) मधील प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०२१.**
**दिनांक :– १० ऑक्टोबर, २०२५**

# सूचना

क्र. टिपीबी- ४३२५ / ९५५२/प्र.क्र.११२/२०२५/नवि-१९

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख उक्त नियमावली असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस- १८२८/प्र.क्र.२३६/१८/ वियो व प्रायों /कलम ३७ (१कंक) (ग) व कलम २० (४) /नवि-१३, दि. ०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी उक्त नियमावलीचे प्रकरण ६ मध्ये अनुज्ञेय हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) लोडिंगसह एकूण परवानगीयोग्य चटईक्षेत्र निर्देशांकासंबंधी तरतुदी समाविष्ट आहेत आणि ज्याअर्थी, विनियम ६.३ मधील तक्ता ६-जी खालील टीप (v) मधील तरतुदीनुसार, स्तंभ क्रमांक ५ किंवा ८ मध्ये नमूद केलेल्या टीडीआरच्या किमान ३०% आणि कमाल ५०% टीडीआर हा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत उत्पन्न झालेला टिडीआर (स्लम टिडीआर), शहरी नूतणीकरण योजनेतील टिडीआर/विनियम १४.८.८(iv)(c)(i) अंतर्गत णठझ अधिसूचित क्षेत्रातून उत्पन्न झालेल्या टीडीआर / सुविधा बांधकामाच्या बदल्यातील टीडीआर-मधून (URT निर्मितीपर्यंत) वापरला जाईल. जर असा टीडीआर उपलब्ध नसेल तर इतर टीडीआर वापरता येईल, अशी तरतूद आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त तरतूद असा करण्यात आलेला आहे):

आणि ज्याअर्थी, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडील दि. २३/०१/२०२५ रोजीचे पत्र शासन नगर विकास विभागास प्राप्त झाले असून, सदर पत्रात असे नमूद आहे की, विनियम ६.३ मधील टीप (v) ची - तरतूद URT च्या वापरासाठी प्राधान्य देते. सदर तरतुदीमुळे स्लम टिडीआर/कन्स्ट्रक्शन टिडीआरची बाजारातील मागणी कमी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे विकासक यांचा झोपडपट्टी-पुनर्विकास योजना/ कन्स्ट्रक्शन टिडीआरमधून सुविधांचे बांधकाम करणेकरिता कल कमी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. तरी झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन व त्यातून निर्माण होणारा स्लम टिडीआर याकरिता तसेच Construction Amenity TDR च्या मोबदल्यात सुविधांचे विकसनासाठी विकासक यांचा प्रतिसाद कायम राहणेच्या दृष्टीने विनियम ६.३ तक्ता ६ जो खालील टीप (v) मधील till generation of URT ही नोंद वगळणे बाबत शासन स्तरावर विचार व्हावा, स्लम टिडीआर/कन्स्ट्रक्शन टिडीआर व युआरटी टिडीआर यांना समकक्ष केल्यास कन्स्ट्रक्शन टिडीआरचे माध्यमातून सुविधा विकसीत करणेकरिता विकासक यांचा प्रतिसाद कायम राहील व आर्थिक बोजा न येता नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असे उक्त प्राधिकरणाचे पत्रात नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नमूद विनंती व वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त नियमावलीचे विनियम ६.३ मधील तक्ता ६ जी खालील टीप (v) मध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल करणे सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे. (यापुढे याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करणेत आलेला आहे):

आता त्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तींचा वापर करुन, प्रस्तावित फेरवदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. प्रस्तावित फेरवदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना 'यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिकारी असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे;

सदरची सूचना. कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे..
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण.
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९.मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१० .मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती)

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये निर्देश देत आहे की. उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

सदरची सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम ) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अमर पाटील**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

परिशिष्ट

( शासन नगर विकास विभाग सूचना क्र. टिपीबी-४३२५ /९५५२/प्र.क्र.११२/२०२५/ नवि-११, दिनांक — १० ऑक्टोबर,२०२५ सोबतचे परिशिष्ट)

| Reg. No. | Existing Provision | Proposed Provision |
|---|---|---|
| Note (v) under Table No. 6G of Regulation No.6.3. | Out of quantum of TDR mentioned in Column No. 5 or 8 minimum 30% and subject to maximum 50% of TDR shall be utilised out of the TDR generated from Slum Rehabilitation Scheme (Slum TDR) / Urban Renewal TDR/TDR generated from the area of notified URP as per Regulation No. 14.8.8 (iv) (c) (i) / Amenity construction TDR (till generation of URT). If such TDR is not available then other TDR may be used." | Out of quantum of TDR mentioned in Column No. 5 or 8 minimum 30% and subject to maximum 50% of TDR shall be utilised out of the TDR generated from Slum Rehabilitation Scheme (Slum TDR) / Urban Renewal TDR/TDR generated from the area of notified URP as per Regulation No. 14.8.8 (iv) (c) (i) / Amenity construction TDR ~~(till generation of URT)~~. If such TDR is not available then other TDR may be used. |

( अमर पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.
Notice under section 37 (1AA) of the said Act rend with directives under section 154 of the suid Act.
Proposed modification in Note (v) under Regulation 6.3 Table-6G of the Unified Development Control and Promotion Regulations.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated: 10 October, 2025.**

# NOTICE

No.TPB-4325/1552/CR-112/2025/UD-11

Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR)(hereinafter referred to as "the said UDCPR") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, & some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1818/CR.238/18/DP. & RP./Sec.37 (IAA) (c) & sec.20(4)/UD-13, dated 02/12/2020 and the said UDCPR has come into force from 03.12.2020:

And Whereas, Chapter 6 of the said UDCPR includes provisions regarding total Permissible FSI including permissible TDR loading; And whereas, provision of Note (v) under Regulation 6.3 Table 6-G stipulates that, out of quantum of TDR mentioned in Column No.5 or 8 minimum 30% and subject to maximum 50% of TDR shall be utilised out of the TDR generated from Stum Rehabilitation Scheme (Slum TDR)/ Urban Renewal TDR / TDR generated from the area of notified URP as per Regulation No.14.8.8(iv)(c)(i) Amenity construction TDR (till generation of URT). If such TDR is not available then other TDR may be used (hereinafter referred to as "the said provison");

And Whereas, Government in Urban Development Department has received a letter dated 23/01/2025 from Municipal Commissioner, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Authority") wherein it is stated that, "provision of Note (v) under Regulation 6.3 gives priority for the utilization of URT. This may lead to decrease in the market demand for slum TDR / construction TDR. Therefore, there is a possibility that the developers will be less inclined to construct facilities through slum redevelopment scheme / construction TDR. In order to maintain the response of developers for taking up Slum Rehabilitation Schemes and the slum TDR generated from it, as well as for the development of facilities in return of Construction Amenity TDR, the deletion of the entry "till generation of URT" mentioned in the Note (v) under Regulation 6.3 Table 6-G shall be considered by the Government. If Slum TDR/Construction TDR and URT TDR are made equivalent to TDR, developers will continue to respond to develop facilities through Construction TDR and it will be possible to provide various facilities to the citizens without incurring financial burden":

And whereas, in view of the above said request and facts, the Government in Urban Development Department is of the opinion that in the public interest, it is expedient to modify Note (v) under Regulation 6.3 Table 6-ti of the said UDCPR as specifically described in the Schedule attached herewith (hereinafter referred to as "the Proposed Modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(IAA) (a) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect of the proposed modification. Any objections/suggestions upon the proposed modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as "an Officer" to hear objections/suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said Officer").

This notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.

1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkan / Pune/ Nagpur Nashik / Amravati/Chhatrapati Sambhaji Nagar Division.
2. The Commissioners All concerned Municipal Corporations. (Except. Brihinmumbai Municipal Corporation)
3. The Collectors, All Districts.
4. The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Developments Authorities.
5. Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
6. Office of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor, World Trade Centre, Mumbai-.5
7. The Chief Executive Officer, Kolhapur Urban Area Development Authority, Kolhapur.
8. All Special Planning Authorities New Town Development Authorities.
9. The Chief Executive Officer, All Zilla Parishads.
10. The Chief Officers, All Municipal Councils/ Nagar Panchyats.

Further, the Government hereby issues directives under Section 154(1) of the said Act that. pending sanction to the Proposed Modification under clause (C) of Section 37(IAA) of the said Act by the Government, the Proposed Modification shall come into force forthwith.

This notice is also available on the Government website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(Amar Patil)
Under Secretary to Government

**SCHEDULE**

Accompaniment to the Government in Urban Development Department Notice No. TPB- 4325/1552/C.R.112/2025/UD-11, dated :- 10th October, 2025.

| Reg. No. | Existing Provision | Proposed Provision |
|---|---|---|
| Note (v) under Table No. 6G of Regulation No.6.3. | Out of quantum of TDR mentioned in Column No. 5 or 8 minimum 30% and subject to maximum 50% of TDR shall be utilised out of the TDR generated from Slum Rehabilitation Scheme (Slum TDR) / Urban Renewal TDR/TDR generated from the area of notified URP as per Regulation No. 14.8.8 (iv) (c) (i) / Amenity construction TDR (till generation of URT). If such TDR is not available then other TDR may be used." | Out of quantum of TDR mentioned in Column No. 5 or 8 minimum 30% and subject to maximum 50% of TDR shall be utilised out of the TDR generated from Slum Rehabilitation Scheme (Slum TDR) / Urban Renewal TDR/TDR generated from the area of notified URP as per Regulation No. 14.8.8 (iv) (c) (i) / Amenity construction TDR ~~(till generation of URT)~~. If such TDR is not available then other TDR may be used. |

( Amar Patil )
Under Secretary to Government.


## जाहीर प्रगटन

मौजे उस्मानपुरा ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. १३६/अ पैकी प्लॉट नंबर ३२ ज्याचा मनपा पीन नंबर ४०, ५०, ७०, ९०, ७०, ४२२ असून, साईज लांबी पूर्व-पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर २७ फुट म्हणजे ८.२३ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १००.३७ चौरस मीटरचा प्लॉट मोहम्मद अली खान अमजद मोहम्मद मुजफर खान रा. हैदरगार्डन देगलूर नाका, नांदेड यांचेकडून फातेमा अंजूम सय्यद यासीन राहणार नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा- पूर्वेस -९ फुट रुंद रोड, पश्चिमेस -प्लॉट नंबर ३८ चा भाग, दक्षिणेस -प्लॉट नंबर ३१ आणि उत्तरेस -१९ फुट रुंद रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत फातेमा अंजूम सय्यद यासीन यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**फातेमा अंजूम सय्यद यासीन द्वारा- नूरमोहम्मद इनामदार**
**मो. ८६२३०९५९१९, ९८२३८२४३१५**

## मार्कमेमो हरवला

माझा गार्गी गणेश जोगदंड या नावाचा १२ वी पासचा मार्कमेमो जुना मोंढा ते श्रीनगर ऑटो प्रवासात हरवला आहे. संपर्क पत्ता-कविता जोगदंड, कवीगण, कॅनाल रोड वैभव जीम जवळ, नांदेड मो. ८७८८५२४४८७

## Change In Name

My old Name is **KUNAL SAMBHAJIRAO LOHAGAONKAR** WhichnowIamChangingasNew Name **KUNAL SAMBHAJI LOHAGAONKAR**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address- Rajgruha, Near Rajiv Gandhi College, Naik Nagar, Near Anand Nagar, Nanded-431605 Mo. No. 9860269917**

## Change In Name

My old Name is **SHAIKH AJIM SHAIKH CHOTEMIYA** Which now I am Changing as New Name **SHAIKH AZEEM SHAIKH CHOTEMIYA**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name **- Address- H.No. 1-20-25, Higoli Gate, Ashraf Nagar, Nanded Post. Shivaji Nagar, Nanded**

## Change In Name

My old Name is **SHAIKH SHAKEELA BI** Which now I am Changing as New Name **SHAKEELABI SHAIKH AZEEM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address- H.No. 1-20-25, Higoli Gate, Ashraf Nagar, Nanded Post. Shivaji Nagar, Nanded**

## Change In Name

My Old Name is **NAUSHEEN AALIYA SHAIKH LATEEF** NOW I AM CHANGING as a New Name **NAUSHEEN ALIYA SHAIKH LATEEF** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Sign By - NAUSHEEN ALIYA SHAIKH LATEEF** Lane No. 4, Near Imran Kirana Maqdoom Nagar, Shivaji Nagar, Nanded(MS)-431602



## Change In Name

My Old Name is **NAUSHEEN AALIYA SHAIKH LATEEF** NOW I AM CHANGING as a New Name **NAUSHEEN ALIYA SHAIKH LATEEF** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Sign By - NAUSHEEN ALIYA SHAIKH LATEEF** Lane No. 4, Near Imran Kirana Maqdoom Nagar, Shivaji Nagar, Nanded(MS)-431602

## जाहीर प्रगटन

मौजे उस्मानपुरा ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. १३६/अ पैकी प्लॉट नंबर ३२ ज्याचा मनपा पीन नंबर ४०, ५०, ७०, ९०, ७०, ४२२ असून, साईज लांबी पूर्व-पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर २७ फुट म्हणजे ८.२३ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १००.३७ चौरस मीटरचा प्लॉट मोहम्मद अली खान अमजद मोहम्मद मुजफर खान रा. हैदरगार्डन देगलूर नाका, नांदेड यांचेकडून फातेमा अंजूम सय्यद यासीन राहणार नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा- पूर्वेस -९ फुट रुंद रोड, पश्चिमेस -प्लॉट नंबर ३८ चा भाग, दक्षिणेस -प्लॉट नंबर ३१ आणि उत्तरेस -१९ फुट रुंद रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत फातेमा अंजूम सय्यद यासीन यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**फातेमा अंजूम सय्यद यासीन द्वारा- नूरमोहम्मद इनामदार**
**मो. ८६२३०९५९१९, ९८२३८२४३१५**



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## ‘एमएमसी’ नोंदणीच्या निषेधार्थ ‘आयएमए’चे आंदोलन; आजपासून रुग्णालये बंद ठेवण्याचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासनाने बीएचएमएस डॉक्टरांना विशिष्ट अटींवर ॲलोपॅथी उपचार करण्यास परवानगी देण्याच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (इमा) आक्रमक झाली असून, या निर्णयाच्या निषेधार्थ मंगळवारी राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली होती. त्यात नांदेडमधील डॉक्टरांनीही सहभाग घेत जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.




निवेदनात ‘मिक्सोपॅथी’ हा निर्णय अवैज्ञानिक असून, त्यामुळे आधुनिक वैद्यकशास्त्राच्या मानकांवर परिणाम होईल. तसेच रुग्णांच्या सुरक्षिततेशी तडजोड होण्याची शक्यता असल्याचा गंभीर आक्षेप नोंदविण्यात आला आहे. आधुनिक वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण आणि उपचार पद्धतीसाठी स्वतंत्र निकष असताना अशा प्रकारची परवानगी देणे रुग्णहिताच्या विरोधात असल्याचे आयएमएचे म्हणणे आहे.

या निर्णया विरोधात उद्यापासून राज्यभर खासगी रुग्णालये आणि दवाखाने बंद ठेवण्याचा इशारा आयएमएने दिला आहे. आपत्कालीन सेवा मात्र सुरू ठेवण्यावावत स्थानिक पातळीवर निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात आली.

दरम्यान, या राज्यव्यापी आंदोलनाला निवासी डॉक्टरांची संघटना मार्ड तसेच आस्मी या संघटनांनीही जाहीर पाठिंबा दिला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील विविध संघटना एकत्र येत शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करताना उपस्थित डॉक्टरांनी रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी वैज्ञानिक वैद्यकीय उपचारपद्धतीचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे सांगत शासनाने संबंधित अधिसूचना रद्द करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## जुगार अड्ड्यावर एलसीबीची धडक कारवाई; ९ जण ताब्यात, ३.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त

### देवापूरमधील तिर्रट अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; २ आरोपी फरार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुदखेड पोलीस ठाणे हद्दीतील देवापूर येथील जुगार अड्ड्यावर कारवाई करून ९ आरोपींना ताब्यात घेतले. यावेळी एकूण ३ लाख ३४ हजार ३०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मुदखेड पोलीस ठाणे हद्दीतील देवापूर पुनर्वसन वसाहतीमध्ये सुरू असलेल्या तिर्रट (जुगार) अड्ड्यावर पंचांसमक्ष सापळा रचून छापा टाकला.

पोलिसांनी सोनू दत्ता सरोदे (वय ३५), रा. आंबेडकर नगर, नांदेड, गणेश गुलाब पवार (वय २०) रा. आमदुरा, ता. मुदखेड, रामदास संभाजी पवार (वय २३) रा. आमदुरा, ता. मुदखेड, अक्षय मधुकर नंदनवरे (वय ३०), रा. राहुल नगर वाघाळा, नांदेड, भैय्यासाहेब राजू जमदाडे (वय २१) रा. राहुल नगर, वाघाळा, नांदेड, अरुण शिवाजी पांडुर्णे (वय २४), रा. वासरी, ता. मुदखेड, माधव शंकर बुक्तरे (वय २५), रा. पावडेवाडी नांदेड, मोहम्मद आयुब अब्दुल रशीद (वय २८), रा. रेहमतनगर, नांदेड, कृष्णा भुजंगा इसनकर (वय २७), रा. बडपुरा, नांदेड यांना अटक करण्यात आली. मात्र राजू खानसाळे रा. शिवाजीवाडी, ता. मुदखेड, आकाश परनाळे रा. कौठा, ता. नांदेड हे दोघेजण फरार झाले.

या कारवाई दरम्यान आरोपींकडून ७३ हजार रुपये रोख, २ लाख ५८ हजारांचे ९ मोबाईल, तिर्रट जुगारासाठी वापरण्यात आलेले ३४ छाप पत्ते असा एकूण ३ लाख ३४ हजार ३०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संबंधित आरोपींविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १४५/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.




**नांदेड –**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने आयटीआय येथे सपकाळ यांच्या प्रतिमेस जोडे मारून निषेध करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण, उद्योग विभागाचे मराठवाडा अध्यक्ष श्रीधरराव नागापूरकर, उत्तमराव सोनकांबळे, रा.यु.का. शहर कार्याध्यक्ष माधव चिंचाळे, माणिक देशमुख आदी दिसत आहेत. (छाया : नरेंद्र गडप्पा)

## हिमायतनगर शहरातील मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास

### नगरपंचायत व पोलीस प्रशासनाची उमर चौक परिसरात संयुक्त कारवाई

**हिमायतनगर (प्रतिनिधी)–** शहरातील मुख्य रस्त्यांवर दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि पादचाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन हिमायतनगर नगरपंचायत व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे.

हिमायतनगर नगरपंचायत प्रशासनाकडून या मोहिमेचा प्रारंभ सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी शहरातील महत्त्वाच्या उमर चौक परिसरातून करण्यात आले आहे. नगरपंचायत प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या समन्वयातून झालेल्या या कारवाईमुळे शहरातील उमर चौक परिसरातील मुख्य रस्ता अतिक्रमणमुक्त झाला असून, नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील प्रमुख रस्त्यांवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले हातगाडे, दुकानांसमोरील वाढीव शेड, फलक, साहित्य तसेच इतर अतिक्रमणामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. विशेषतः उमर चौक परिसर हा शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग असल्याने येथे नेहमीच वाहतूक कोंडी होत होती. शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि



दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक वेळा किरकोळ अपघातही घडत असल्याने नागरिकांकडून अतिक्रमण हटविण्याची मागणी सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर नगरपंचायत प्रशासनाने जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार शहरातील पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने सकाळपासूनच अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली. जेथे रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते. तेथील अतिक्रमणे हटविण्यात आली. काही व्यापाऱ्यांनी स्वतःहून सहकार्य करत आपले साहित्य हटविले, तर काही ठिकाणी प्रशासनाने नियमानुसार कारवाई केली. संपूर्ण कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे यासाठी शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मोहिमेमुळे उमर चौक परिसरातील मुख्य रस्ता पूर्ववत मोकळा झाला असून वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

## पेन्शनवरील संभ्रम आणि सातवा वेतन आयोग लागू करा; ‘मजीप्रा’ कर्मचाऱ्यांचे आझाद मैदानात बेमुदत धरणे

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) सेवानिवृत्त आणि कार्यरत कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ, तसेच प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ‘महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कृती समिती’च्या नेतृत्वाखाली ३ ऑगस्ट २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन पुकारण्यात आले आहे.



या आंदोलनाला ४ ऑगस्ट २०२६ रोजी निवृत्त आणि कार्यरत कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दर्शवला व शासनाचा तीव्र निषेध नोंदवला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील ४० वर्षांपासून विनाअडथळा पेन्शन मिळत आहे. मात्र, अलीकडेच प्राधिकरणाच्या वित्तसंचालकांकडून या पेन्शन प्रक्रियेत जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्यात आला आहे. यामुळे वयोवृद्ध सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे.

तसेच शासनाच्या २३ मार्च २०१७ च्या निर्णयानुसार (जी. आर.) प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व आर्थिक लाभ मिळणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, १ जानेवारी २०१६ पासून संपूर्ण राज्यात लागू झालेला ‘सातवा वेतन आयोग’ अद्याप मजीप्रा कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेला नाही.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रास्त मागण्या आणि त्यातच पेन्शनबाबत नव्याने उपस्थित केलेला मुद्दा यामुळे कर्मचाऱ्यांच्या संयमाचा बांध फुटला आहे.

जोपर्यंत शासन आणि प्राधिकरणाचे प्रशासन आमच्या रास्त मागण्या मान्य करून ठोस निर्णय घेत नाही तोपर्यंत आझाद मैदानावरील हे बेमुदत धरणे आंदोलन असेच सुरू राहील असा ठाम निर्धार यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला.

४ ऑगस्ट रोजी झालेल्या आंदोलनात प्राधिकरणाचे अनेक वरिष्ठ सेवानिवृत्त अधिकारी आणि सध्या कार्यरत असलेले कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने सेवानिवृत्त मुख्य अभियंता व्ही. आर. कल्याणकर, एन. एन. तोरलुडवार, एम. एस. बोडके, बी. एच. लाडेकर, एस. जे. गोणे, व्यंकटराव गंधलवार, ए. जी. आदमाने, एस. एल. नागलगावे, कास्ट्राईब संघटना जिल्हाध्यक्ष पी. एम. कोकरे, केसराळीकर आणि एम. एम. गायकवाड यांच्यासह राज्यभरातून आलेले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे शेकडो कार्यरत अधिकारी आणि सेवानिवृत्त कर्मचारी या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

## भगवानराव तिरमनवार यांचे निधन

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील बेल्लोरी येथील ज्येष्ठ नागरिक, भाजप किसान मोर्चाचे किनवट मंडळ अध्यक्ष जगदीश तिरमनवार यांचे वडील भगवानराव नरसिंगराव तिरमनवार (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. तिरमनवार यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी बेल्लोरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## राचव्वाबाई हांद्रे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील थडीसावळी जुनी येथील रहिवासी राचव्वाबाई शंकरराव हांद्रे यांचे वृद्धापकाळाने मंगळवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ सुना, २ मुली, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे.

## नरसिंगराव सातूरवार यांचे निधन



**किनवट (प्रतिनिधी)–** येथील सरस्वती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, विश्व हिंदू परिषदेचे ज्येष्ठ नेते नरसिंगराव रामलू सातूरवार (वय ८८) यांचे मंगळवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सातूरवार यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी किनवटच्या कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## भोकर फाटा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत तीनजण जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** भोकर येथून नांदेडकडे चार तरुण दोन मोटारसायकल घेऊन जात होते. भोकर फाटा येथे सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा दुचाकीला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने तिघेजण जखमी झाले आहेत.

या अपघातात नांदेड येथील सुमेध सावंत आणि सुनील काळे हे दोघे गंभीर जखमी झाले असून, विशाल पंडित हा युवक किरकोळ जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच श्रीमद जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने जखमींना तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात आज नांदेडमध्ये जनजागरण मेळावा

### एमएसपी व शेतकरी प्रश्नांवर चर्चा; किसान युनियनचे शक्तिप्रदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय किसान युनियन (महाराष्ट्र प्रदेश) यांच्या वतीने भारत-अमेरिका ट्रेड डील विरोधी जनजागरण अभियान अंतर्गत बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी टिकैत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. केंद्र सरकारवर त्यांनी यावेळी सडकून टीका केली.




या मेळाव्यात राकेश टिकैत- राष्ट्रीय प्रवक्ते, भारतीय किसान युनियन युद्धवीर सिंग - राष्ट्रीय महासचिव राजवीर सिंह जादौन, भाई चंद्रशेखर नलावडे-पाटील - अध्यक्ष, भारतीय किसान युनियन महाराष्ट्र प्रदेश, रुपालीताई पाटील- महासचिव, महाराष्ट्र प्रदेश तसेच संघटनेचे राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या मेळाव्यात शेतमालाला कायदेशीर हमीभाव, प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराचे, कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणाम, जमीन अधिग्रहण, सिंचन, वीज, पीकविमा, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, शेतीचा वाढता उत्पादन खर्च, कृषी धोरणे आणि शेतकऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्नाविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या दरम्यान भारतीय किसान युनियनचा संघटन प्रवेश सोहळा देखील आयोजित करण्यात आला आहे. यात अनेक शेतकरी, युवक व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी भारतीय किसान युनियनमध्ये प्रवेश करणार आहेत.

या मेळाव्यात स्थानिक शेतकरी नेते विठ्ठलराव पावडे, मोहनराव शिरसाट पाटील, रामचंद्र आईलवाड आणि पुरुषोत्तम धोंडगे आदीजण विचार मांडणार आहेत.

## चालकाची गळफास घेऊन आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भावसार चौकाजवळील गीते पेट्रोल पंप परिसरात एका वाहन चालकाने टेम्पोला दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार राजेश वानखडे (वय ५५, रा. जैन मंदिर परिसर, बेटसांगवी) यांनी टेम्पोला दोरी बांधून गळफास घेत जीवन संपविले. या घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, उपनिरीक्षक संकेत सवराते व पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला.

## नांदेड विभागात एका दिवसाच्या तिकीट तपासणी मोहिमेत १,०८७ प्रकरणे; ६ लाखांचा महसूल वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वे, मुख्यालयाच्या निर्देशानुसार तिकीट तपासणी अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच तिकीटधारक प्रवाशांना आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नांदेड विभागात दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ४:३० ते सायंकाळी १९:३० या कालावधीत व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेत एका दिवसात विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास आणि बुक न केलेले सामान अशा एकूण १ हजार ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आली असून, ५ लाख ९८ हजार ३३५ रुपये इतका महसूल वसूल करण्यात आला.

ही मोहीम हजूर साहिब नांदेड- आदिलाबाद, हजूर साहिब नांदेड- परभणी- जालना- छत्रपती संभाजीनगर- मनमाड, परभणी- परळी वैजनाथ आणि पूर्णा- अकोला या मार्गांवर राबविण्यात आली.

मोहिमेत ३२ तिकीट तपासणी पथक कर्मचारी, १४९ तिकीट तपासणी कर्मचारी, १४ स्टेशन तपासणी कर्मचारी, ४ विभागीय वाणिज्य निरीक्षक तसेच ३ रेल्वे सुरक्षा बल कर्मचारी सहभागी झाले होते. या दरम्यान २९ गाड्यांची सखोल तपासणी करण्यात आली.



१ हजार ८७ प्रकरणांतून मोठा महसूल जमा केला आहे. विनातिकीट प्रवास ५१६ प्रवाशांकडून ४ लाख ४ हजार ५९० रुपये, अनियमित प्रवास १५७ जणांना १ लाख १७ हजार ३१० रुपयांचा दंड आकारला. बुक न केलेले सामान ४१४ जणांकडून ७६ हजार ४३५ असा एकूण १ हजार ८७ जणांकडून ५ लाख ९८ हजार ३३५ रुपये आणि इतर कारवाईत तिकीट तपासणी व्यतिरिक्त अनधिकृत फेरीवाल्यांची ५ प्रकरणे आढळून आली असून त्यांच्याकडून १० हजार दंड वसूल करण्यात आला. तसेच अस्वच्छता (लिटरिंग) संबंधित ४ प्रकरणे नोंदवून १ हजार १०० रुपये दंड आकारण्यात आला. धूम्रपानाशी संबंधित कोणतेही उल्लंघन आढळून आले नाही.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com